प्रकरण तिसरे

# ‘महात्मा’ मधील कथानक

प्रकरण तिसरे

# ' महात्मा ' मधील कथानक

## ३.१ प्रास्ताविक :

रवींद्र ठाकूर लिखित 'महात्मा' ही मराठी साहित्यविश्वातील एक महत्त्वाची चरित्रात्मक कादंबरी आहे. चरित्रात्मक कादंबरी म्हणजे महान व्यक्तीची जीवनकथाच होय. त्या व्यक्तीचे चरित्र आपल्यासमोर असते. तत्कालीन सामाजिक, कौटुंबिक, राजकीय जीवन, चरित्र नायकाने केलेला संघर्ष ह्या सर्व गोष्टींचा तपशीलवार वृत्तांत आपल्यासमोर आलेला असतो. 'महात्मा' ही म.जोतिराव फुले ह्यांच्या जीवनावर लिहिलेली कादंबरी असून सर्वच दृष्टीने दर्जेदार अशी झालेली आहे. कादंबरीच्या उभारणीसाठीचे १) कथानक, २) व्यक्तिरेखा, ३) वातावरणनिर्मिती व ४) भाषाशैली हे चार प्रमुख घटक होत. त्यांच्याद्वारेच आपण 'महात्मा' ह्या कादंबरीचे मूल्यमापन करणार आहोत.

## ३.२ 'महात्मा' मधील कथानक :

वाचकाच्या मनातील कुतुहल जागृत होऊन पुढे काय, असा प्रश्न त्याच्या मनात तयार होतो व त्यातून वाचक आपल्या जिज्ञासपूर्तीसाठी पुढेपुढे कादंबरी वाचत राहतो. कथानक माहीत असूनही वाचकाला जर कादंबरीविषयी ओढ वाटत राहिली, तर ते त्या कादंबरीचे यश म्हणता येते. रवींद्र ठाकुरांच्या 'महात्मा' ह्या कादंबरीमध्ये आपणास हेच दिसून येते. जिज्ञासा ही नैसर्गिकच गोष्ट आहे आणि अशाच जिज्ञासेतून कादंबरीची निर्मिती होत असते. कादंबरीतील कथानक हे साखळीप्रमाणे असते. एका घटनेतून दुसरी घटना घडत असते. कथानक पुढे पुढे सरकत असते. हेच वैशिष्ट्य आपणास 'महात्मा' मध्ये दिसून येते. 'महात्मा' ह्या कादंबरीचा चिकित्सक अभ्यास करताना तिचे कथानक काय आहे, हे आपल्याला जाणून घ्यावे लागते. 'महात्मा' ही कादंबरी तर आहेच. पण

त्याबरोबर ते म. जोतीराव फुले ह्यांचे चरित्रही आहे. म्हणजेच ती चरित्रात्मक कादंबरी आहे. ह्या कादंबरीचे एकूण चार भाग असून १०१ प्रकरणे आहेत. ह्या कादंबरीतून रवींद्र ठाकूर ह्यानी म. फुले ह्यांचे चरित्र वाचकासमोर ठेवले आहे. फुले ह्यांच्या काळात असणारी एकूण सामाजिक स्थिती, त्यांचे त्यावेळेचे जीवन, ब्राह्मण लोकांचे असलेले वर्चस्व, त्यांनाच मिळणारा मान-सन्मान, त्यांच्या लबाड्या, दक्षिणेसाठी त्यांनी केलेली शेतकऱ्यांची व दीन दुबळ्या लोकांची लुबाडणूक, हे सर्व माहीत असूनही त्यांच्या वर्चस्वाला बळी पडणारा शेतकरी ह्या सर्वांचे चित्रण ह्या कादंबरीत आले आहे. कादंबरी वाचल्यानंतर आपल्याला जाणवते की, फुले ह्यांचा राग ब्राह्मणांवर नव्हता, तर त्यांच्या ब्राह्मण्यावर होता, त्यांच्या वर्चस्वावर होता. त्यांचे काही सहकारी मित्र हे ब्राह्मण जातीचे होते. थोडक्यात, म. फुल्यांना फक्त ब्राह्मणी वर्चस्व नको होते.

'महात्मा' कादंबरीतून हे स्पष्ट होते की, जोतीराव फुले ह्यांनी आपल्या आयुष्याच्या शेवटच्या क्षणापर्यंत समाजाची सेवा केलेली आहे. समाजासाठी जेवढे काही करता येईल, ते त्यांनी केलेले आहे. त्यांची एकूणच समाजसेवेची वृत्ती सर्व कादंबरीभर दिसून येते. त्यांना मिळालेली 'महात्मा' ही पदवी त्यांच्या समाजसेवेचे गोड फळच आहे. शिवाय त्यांच्यावर समाजाने दाखविलेला विश्वासच आहे. काही कारणामुळे मित्रात आलेले वितुष्ट, तरीही त्यांच्याशी अखंड राहिलेली मैत्री ह्या सर्वांमधून कथानक फुलत जाते.

### **३.२.१ कादंबरीची विभागणी :**

'महात्मा' ह्या कादंबरीतील संपूर्ण कथानक हे जोतीराव फुले, त्यांची पत्नी सावित्रीबाई, त्यांचा मित्रपरिवार, त्यांच्या भोवतीचा एकूण समाज ह्यांच्या भोवती घडते. ही कादंबरी चार भागांमध्ये विभागली गेली आहे व त्यात एकूण १०१ प्रकरणे आहेत. पहिल्या भागात १ ते २७ प्रकरणे (१ ते १२० पृष्ठे), दुसऱ्या भागात २८ ते ८२ प्रकरणे (१२० ते ३५२ पृष्ठे), तिसऱ्या भागात ८३ ते ९५ प्रकरणे (३५२ ते ४२३ पृष्ठे) व चौथ्या भागात ९६

ते १०१ प्रकरणे (४२४ ते ४५५ पृष्ठे) समाविष्ट आहेत. कादंबरीच्या सुरूवातीला कादंबरीकाराने व्यक्तिरेखांची थोडक्यात ओळख करून दिली आहे. ह्यावरून कादंबरीकाराची सखोल अशी अभ्यासू वृत्ती तर दिसतेच, शिवाय वाचकांचीही सोय झाली आहे. कादंबरीकाराने 'गुलामगिरी' ह्या ग्रंथातील गुलामगिरीविरुध्द बंड करून उठण्याचा संदेश दिला आहे. सर्व कादंबरीतून शूद्र, अतिशूद्र समजल्या जाणाऱ्या लोकांच्या हितासाठी, त्यांच्या कल्याणासाठी झटणे, एवढेच उद्दिष्ट ठेवून जगणाऱ्या म.फुले ह्यांच्या जीवनाचे चरित्र आलेले आहे. वर्षानुवर्षे चालत आलेल्या रुढी परंपरा बदलण्याचा मनोमन विचार करून बंडखोर वृत्तीने सतत झटत राहणारे म. फुले म्हणजेच तात्या आपल्यासमोर ह्या कादंबरीतून उभे राहतात.

### ३.२.२ पहिल्या भागातील कथानकाची सुरूवात :

कादंबरीच्या कथानकाला सुरूवात होते ती 'शाळा सुटण्याची घंटा झाली. जोती वर्गातून बाहेर पडला', ह्या वाक्यापासून. प्रत्यक्ष प्रसंग उभा करण्याच्या अशा कुशलतेमुळे हे कथानक अत्यंत उत्कृष्ट वाटत राहते. थॉमस पेन ह्यांच्या विचाराने झपाटलेला जोती. त्यांचेच विचार मनात घोळवत ठेवणारा. 'मानवी प्रतिष्ठा, व्यक्तिस्वातंत्र्याचा पुरस्कार आणि गुलामगिरीचा सर्वंकष निषेध', ह्या पेनच्या विचारांनी जोती पुरता झपाटून गेला होता. 'द वर्ल्ड इज माय कंट्री', 'माय रिलिजन इज टु डू गुड', 'माय ओन माईंड इज माय ओन चर्च' अशी वाक्ये त्याला विचार करण्यास प्रवृत्त करीत होती. ह्या विचारांच्या तंद्रीत असल्यामुळे त्याचे आज कोठेच लक्ष लागत नव्हते. लहुजीबुवांच्या तालमीत दांडपट्टा खेळण्यातही त्याचे मन लागत नव्हते. तशाच अवस्थेत असलेल्या जोतीने देवदेवश्वराच्या मंदिराजवळ प्रवेश केला. तेथील ब्राह्मणांची एकूण हालचाल पाहून त्याच्या मनात चीड निर्माण झाली. 'ह्या अत्याचारामुळे दबून गेलेल्या जनतेसाठी काहीतरी केले पाहिजे.

पेनसारखे बंडखोर विचार त्यांच्यापर्यंत पोहोचविले पाहिजेत', असे त्याला वाटू लागले. पेनचे एकेक वाक्य जोतीने आपल्या काळजावर कोरून ठेवले होते.

''ईश्वर एकच असून त्याच्यावरील आंतरिक श्रध्दा हीच महत्त्वाची आहे. त्यासाठी कुठलाही ग्रंथ प्रमाण मानण्याची गरज नाही, की कुठल्या मध्यस्थाची गरज नाही. जगातील सर्व माणसांचा धर्म एकच असून तोच मानवताधर्म होय. ईश्वरनिष्ठा आणि नैतिक सत्याचे आचरण, हेच खरे धर्मजीवन होय. धर्मश्रध्दा ही प्रत्येकाची खाजगी बाब असून तिच्यावर कोणाचीही सत्ता चालत नाही. धर्मग्रंथ पवित्र आणि पूजनीय मानले गेले असले, तरी ते ईश्वरप्रणित नाहीत. ते मनुष्य निर्मित असून भोंदू लोकांनी त्यांचे उगीचच स्तोम माजवून ठेवले आहे. विश्वनिर्मिता परमेश्वर एकच आहे. म्हणून त्याच्या शुभवर्तमानाचा आशय एकच असला पाहिजे. माणसांमध्ये निर्माण झालेले भेद हेच ईश्वरनिर्मित नाहीत. त्यास धर्मसंस्था कारणीभूत आहेत.''[१] अशा प्रकारचे विचार धन जोतीने आपल्या मन:पटलावर कोरून ठेवले होते. कुठल्याही घटना ज्या आपल्या कार्यात विघ्न आणतात, त्यांना बळी न पडता आपले कार्य निष्ठेने पार पाडणाऱ्या पेन ह्यांच्या विचारांनी जोती सतत विचारमग्न होत होता. त्यांच्याशी आपल्या भारतीयांची तुलना करून आपले भारतीय तर त्याहून भयानक अवस्थत जगतात, ह्याचे ज्ञान जोतीला झाले होते. सामाजिक गुलामगिरीपेक्षा राजकीय गुलामगिरी महत्त्वाची मानून इंग्रजांना हाकलून लावण्याचे कार्य त्याला पटत नव्हते. पुन्हा तीच पेशवाई त्याला नकोशी वाटत होती. आधी सामाजिक गुलामगिरी नष्ट करून मगच राजकीय क्रांती करावी, असे त्याला वाटत होते. लोकांनी मिशनरी लोकांचे हाल चालवले होते. त्यांना दगडधोंडे मारून ते त्रास देत होते. हे सर्व पाहून, ऐकून, छत्रपती शिवाजीमहाराज, जॉर्ज वॉशिंग्टन ह्यांची चरित्रे वाचून जोतीच्या मनात खूप परिवर्तनवादी विचार येऊ लागले. हे त्याचे विचार त्याच्या प्रत्येक संभाषणातून प्रगट होत. ब्राह्मणाची वर्णभेददृष्टी त्याच्या चांगली लक्षात आली होती. त्याला देशाचा अभिमान होता. पण ह्या

14134
A

देशात राहणाऱ्या जनतेचेच हाल हे ब्राह्मण लोक स्वातंत्र्यानंतर करतील म्हणूनच काय उपयोग आहे ही राजकीय परिस्थिती बदलून, असे त्याला वाटत होते.

"देशाचा अभिमान बाळगायला नको ?", असे सखाराम म्हणतात; तेव्हा त्यावर जोतीबा म्हणतात,

"तो आम्ही जरूर बाळगतो. परंतु आमची देशाभिमानाची कल्पना वेगळी आहे. जे लोक गाईचं मलमूत्र पवित्र मानून प्राशन करतात आणि माणसाच्या हातचं स्वच्छ पाणी अपवित्र मानतात, त्यांना पशूपेक्षाही हीन वागवतात; त्यांचा देशाभिमान मला अपवित्र देशाभिमान वाटतो. आपल्या देशातल्या प्रत्येक माणसाच्या हितासाठी झटणारा माणूसच खरा देशाभिमानी म्हणता येईल. आपल्या भटविद्वानांनी भरवून दिलेल्या देशाभिमान्याच्या खुळ्या समजुती डोक्यातून काढून टाका. खऱ्या देशाभिमानाशी त्यांचा काहीएक संबंध नाही."[२]

अज्ञानी समाजाला कुठल्यातरी एखाद्या खुळ्या समजुतीत अडकवून त्यांच्या जिवावर आपले भरपेट जीवन यथेच्छ जगणाऱ्या भटशाही विरुध्द जोतीबांना आवाज उठवायचा होता. त्यांनी पेनच्या विचारांचा अभ्यास केला होता. 'ईश्वरनिष्ठा, नैतिक सत्याचे आचरण हेच धर्मजीवन आहे. ही जी सृष्टी ईश्वराने निर्माण केलेली आहे व ती आपणास डोळ्याला दिसते, हाच त्यांच्या मते धर्मग्रंथ होता. जगातील सर्व माणसांचा धर्म एकच असून तोच मानवताधर्म होय आणि ह्या धर्मस्वातंत्र्यात ढवळाढवळ करण्याचा अधिकार कोणालाही नाही', अशा प्रकारच्या पेनच्या विचारांची छाननी त्यांनी केलेली होती. मित्रांच्या समवेतही ह्याच विषयावर त्यांच्या गप्पा होत असत.

### ३.२.३ अखेर ध्येय ठरले :

जोतीबा म्हणजेच तात्या ह्यांचा स्वाभिमान जागा झाला तो त्यांच्या जिवलग मित्राच्या भावाच्या लग्नात झालेल्या अपमानापासून ब्राह्मण मंडळींच्या लग्नास एक बहुजन

समाजातील अब्राह्मण मुलगा येतो, त्यांच्याबरोबर म्हणजे भूदेवांबरोबर (स्वत:ला समजणाऱ्या) चालतो, हा नापसंतीदर्शक प्रसंग पाहून त्यांच्या मस्तकावरची शीर तडकली होती. 'अब्राह्मण्यम्' असे संतप्त स्वरूपाचे उद्‌गार त्यांच्या तोंडून बाहेर पडत होते. अशातच एका पगडीवाल्या कडव्या ब्राह्मणाने जोतीरावाजवळ येऊन दरडावून त्यांचा अपमान केला. तो म्हणाला, "ए शूद्रा, कुणबटा, वरातीत ब्रह्मवृंदासह चालण्याचे तुला धाडस तरी कसे झाले ? तू स्वत:ला ब्राह्मणांच्य बरोबरीचा समजतोस की काय ? जातपात, रीतिरिवाज यांचा तुला काही विधिनिषेध ? चल, हो बाजूला !"[३]

जोतींना माहीत नव्हते की, बहुजन समाजाला ब्राह्मणांबरोबर चालण्यास कुत्र्यामांजराइतका देखील अधिकार नाही ! आपल्या अपमानाने जोतीबांचा संताप झाला. अशाच स्थितीत ते घरी आले. त्यांच्या अंगाची लाहीलाही होत होती. 'असे का घडले, माझा काय गुन्हा आहे', असे आपल्या वडिलांना (गोविंदरावांना) ते विचारतात. जुन्या परंपरा मानणारे साधेभोळे गोविंदराव काय सांगणार ? उलट तेच प्रसंगाचे गांभीर्य लक्षात येऊन घाबरले होते. ब्राह्मणांच्या धाकामुळे आपले घर जातीबाहेर टाकले जाईल, ह्याची त्यांना भीती वाटत होती. जोतीबांना मात्र हे सहन होत नव्हते. जोतींच्या तोंडून ठिणग्यांप्रमाणे शब्द बाहेर पडत होते,

"वरातीच्या घोड्याचा, एका पशूचा त्यांना विटाळ होत नाही. माणसांचा मात्र विटाळ होतो. हा त्यांचा धर्म ? हा त्यांचा आचार ?"[४]

प्रगल्भ बुध्दीच्या जोतीरावांना विचारच पटत नव्हते. त्या अपमानाच्या डंखाने त्यांच्या हृदयात खोल जखम निर्माण केली होती आणि त्यांच्य विचारांचे परिवर्तन होण्यास हा प्रसंग कारणीभूत ठरला होता. सत्य-असत्य ह्यांचा त्यांच्या मनात सतत झगडा सुरू होता. विचारांचे मंथन चालू झाले. त्यात त्यांच्या वडिलांनी म्हणजे दादांनी त्यांना असे प्रसंग सांगितले की, जे दादांनी स्वत: पेशवाईच्या काळात पाहिले होते, ब्राह्मणांसारखा गंध

लेणे, धोतर कसे नेसायचे, ह्याचेही कायदे असत ते फक्त शूद्रांसाठी. अतिशूद्रांची तर ह्याहून भयंकर स्थिती होती. तेलशेंदूर पाजून त्यांना सर्रास बांधकामात गाडले जात होते. राजरोसपणे रस्त्यावर येण्याचीही त्यांना बंदी होती. आले तर कमरेला फांदी (फास) आणि गळ्यात गाडगे बांधावे लागत असे. अशा प्रकारचे सामाजिक जीवन लोक जगत होते. स्त्रियांना तर हयापेक्षाही महाभयंकर शिक्षा दिल्या जात. ब्राह्मणांना शूद्र आणि अतिशूद्रांच्या सावलीचाही विटाळ होत असे. जी सावलीही त्यांना सहन होत नव्हती, अशांना शूद्र-अतिशूद्रा ह्यांच्या स्त्रिया कशा चालत होत्या बिनबोभाटपणे ? शनिवारवाड्यात बायका पोचत्या केल्या जात होत्या आणि आत पेशवाई नसतानाही सावलीचा विटाळ झाला म्हणून ते अजूनही माणसांना हालहाल करून मारतात. गोविंदरावांना वाटले की, आपला जोती सुखाने घरी आला, हेच आपलं नशीब समजायला पाहिजे. परंतु जोतीरावांना हा अन्याय सहन करायचा नव्हता. ‘ज्यांना आम्ही देव समजतो, ज्यांच्या पायावर आम्ही डोके ठेवतो, त्यांनीच असे वागावे ? त्यांनीच भेदभाव करायचे ? परमेश्वर असा भेद कधीच करीत नाही, लेकरालेकरांमध्ये भेद मानीत नाही. मग ह्यांनीच का हा पक्षपातीपणा करायचा ? त्यांनाच हे शुध्दतेचे, पावित्र्याचे वरदान कोठून मिळाले ? तेही माणसं आहेत. मीही माणूसच आहे, आपण सर्वजण माणसंच आहोत. मग ते श्रेष्ठ कसे ?’, असे त्यांना वाटू लागले.

आर्यभट्टांच्या, त्यांच्य खल्लड धर्माच्या नावाने अंघोळ करूनही जोतींच्या मनातील विचार कमी होत नव्हते. त्यांच्या मनात विचारांचे जाळे पुढीलप्रमाणे गुरफटलेच जात होते : ‘वर्णश्रेष्ठता, जातीयता, स्वर्ग-नरकाच्या खुळचट कल्पना, तेहतीस कोटी देवांचे लेंढार हे सगळे आंधळे गारुड म्हणजे थोतांड आहे. हा सगळा आर्यभटांचा कावा आहे. जातीयतेची उतरंड निर्माण करून प्रत्येकाला त्या जातीच्या खोड्यात अडकवून आपले वर्चस्व प्रस्थापित करण्यासाठी सतत प्रयत्न चालू आहेत. तरीही आमचा समाजबांधव हा गप्प बसून त्यांचे

अन्याय का सहन करीत आहे ? गळ्यात गाडगे आणि कमरेला झाडाची फांदी बांधून हिंडताना त्यांना काहीच का वाटत नाही ? ते अशा परिस्थितीत कसे जीवन जगू शकतात ? एवढ्या एका प्रसंगाने माझे मन पेटून उठते. मग ही माणसे रोजच ही वेदना का सहन करतात ? त्यांच्य मनाची स्थिती समजावून घेतली पाहिजे. हा हिंदू धर्म, सगळे शूद्र-अतिशूद्र पेटून का उटत नाहीत ? त्यांचे मनच मेले आहे दररोजचा त्रास सहन करून-करून. विश्व, मी व ईश्वर एकच, असे सांगून जातिधर्माच्या नावाखाली माणसांना लाथाडत आपले पिढीजात वर्चस्व कमी होऊ नये, आपलेच हक्क सतत गाजवावेत, असेच भटांना वाटत होते. म्हणूनच त्यांनी शूद्र-अतिशूद्रांना शिक्षणाचे दरवाजे खुले करून दिले नव्हते. पण आता गप्प बसून चालणार नव्हते. त्यांना शिक्षणाचे दरवाजे खुले करून दिले पाहिजेत, तरच त्यांची ही पिढ्यानूपिढ्या दुर्दशा आहे. ती संपेल आणि ह्या भटशाहीला सरुंग लागेल. स्त्रिया, शूद्र आणि अतिशूद्र ह्यांना शिक्षणाचे दरवाजे खुले करून देणे, एवढेच आता आपले कार्य आहे. अज्ञानाचे मूळ नाहीसे केल्याशिवाय ह्या समाजाची उन्नती होणार नाही, त्यांना स्वातंत्र्य मिळणार नाही. सर्व दु:खाचे कारण अविद्या, अज्ञान आहे. त्यावर उपाय शिक्षण हाच आहे.' अशा प्रकारे लग्नातील अपमानातून जोतीरावांच्या विशाल कर्तृत्वास एक समाजपरिवर्तनशील असे ध्येय मिळाले. वाचन चिंतन आणि मनन ह्यातच ते स्वत:ला झोकून देत होते. गौतमबुध्द, महात्मा बसवेश्वर, तीर्थंकर ह्यांच्या विचारांचा त्यांचा अभ्यास सुरू होता. मानवाच्या कल्याणासाठी आपले जीवन अर्पण करणाऱ्या येशूचे चरित्र त्यांच्या मनात सतत येत होते.

ब्राह्मण इंग्रजी शिक्षणाला नावे ठेवत. तरीही इंग्रजी शिक्षण घेत व त्याबरोबर माधुकरीही मागत. असे हे ब्राह्मण सोवळे ओवळे तेवढ्यापुरते बाजूला ठेवत. घरी येण्यापूर्वी अंघोळ करीत. मनमानेल तसे वेश धारण करीत. दिवसभर भिक्षुकी मागत. तेच भट रात्र होताच कसविणीच्या दारात हजर असत. काही सावकारही झालेले आहेत.

त्यांच्यात असे काही विद्वान असत की, सर्व काही ह्यांनाच माहीत, अशा पद्धतीने ते सर्व सांगत असत. पाऊस कसा पडतो, ह्याचे कारण असो किंवा सतीचा कायदा कसा चांगला, ह्याच्यावर त्यांच्या चर्चा चालत आणि आजही १८ कलमी वागणेच जास्त पसंत करतात. अशा ह्या भटशाही आव्हानाच्या विरुध्द जोतीरावांना उभे राहायचे होते. म्हणून त्यांनी प्रथम शिक्षण महत्त्वाचे मानले. स्वतःच्या घरापासूनच त्यांनी त्याची सुरूवात केली. ते केवळ बोलघेवडेच नव्हते, तर कर्ते समाजसुधारक होते. म्हणूनच त्यांनी प्रथम आपल्या पत्नीला-सावित्रीबाईंना शिकवण्यास सुरूवात केली. माणसांना त्यांच्या माणूसपणाची जाणीव करून देण्यासाठी ब्राह्मणी वर्चस्वाच्या अधिकाराखाली बळी पडलेल्या स्त्रीलाच अगोदर शिक्षण देणे गरजेचे आहे, हे त्यांनी चांगले जाणले होते. एक स्त्री शिकली, तर मुले शिकतील व सर्वच कुटुंब शिकेल आणि मगच समाजस्थिती बदलेल, ह्यावर त्यांचा विश्वास होता.

### ३.२.४ स्त्रीशिक्षणाचे क्रांतिकार्य :

जोतीरावांनी विद्येला, शिक्षणाला अनन्यसाधारण महत्त्व दिले होते. अविद्या हे सर्व अनर्थाचे मूळ आहे, हे त्यांना चांगले माहीत झाले होते. म्हणूनच ते म्हणतात,

''विद्येविना मति गेली । मतीविना नीति गेली ॥
नीतिविना गति गेली । गतिविना वित्त गेले ॥
वित्ताविना शूद्र खचले । इतके अनर्थ एका अविद्येने केले.''

स्त्रीशिक्षणाला ते प्रथम स्थान देतात. स्त्रिया आणि शूद्र ह्यांना ज्ञानाचे दरवाजे खुले केले पाहिजेत, हे त्यांचे ठाम मत होते.

''जिच्या हाती पाळण्याची दोरी, ती जगाते उध्दरी ॥ ''

म्हणूनच त्यांनी स्त्रीशिक्षणाचे क्रांतिकार्य हाती घेतले. ह्या कार्यात त्यांना त्यांचे मित्र मोरून सखाराम व सदाशिव ह्यांनीही मदत करण्याचे ठरविले. जोतीरावांनी पहिली मुलींची शाळा १८४८ साली भिडे ह्यांच्या वाड्यात सुरू केली. प्रथम सहाच मुली पटावर होत्या. जोतीराव

व सावित्रीबाई ह्यांनी पालकांच्या भेटी घेऊन त्यांच्या मनाची स्थिती जाणून घेतली. त्यांना मुली शाळेत पाठविण्यास तयार केले. दिवसेंदिवस मुलींची संख्या वाढू लागली. उलटसुलट चर्चा ऐकण्यास मिळत होत्या. मुलींना शिकवण्यास विरोध होत होता. मुलींनी शिक्षण घेणे म्हणजे पाप समजले जात होते. जोतिबांना आपल्या जीवित कार्याची दिशा सापडली होती. परंतु त्यांच्या वडिलांनी - दादांनी त्यांना विरोध दर्शविला. शिक्षणाचे महत्त्व दादांनाच पटवून सांगावे लागत होते. दादा परंपरावादी होते. त्रास सहन करूनही जोतिबांनी कार्य चालू ठेवले. भाऊबंदकीचाही विरोध झाला. परंतु ते स्वत:च्या मर्जीने विरोध करीत नव्हते, तर त्यांना भटांनी पाठवून दिलेले होते, हे जोतिबा चांगले जाणून होते. जोतिबा आणि सावित्रीबाई ह्यांनी कष्ट सहन करण्याची जिद्द कायम ठेवली होती. शेणाचिखलाबरोबर दगडांचाही मारा सावित्रीबाईंनी सहन केला. हेटाळणीची बोलणी ह्या साध्वीने सहन केली. हे पहिले धाडस ह्या थोर व्यक्तींनी नसते केले, तर आजही स्त्री समाजाच्या अज्ञानी रुढीत खितपत पडली असती. हे धाडस पूर्णत्वास नेण्यासाठी फुले दांपत्याला घर सोडावे लागले. दादांचा (गोविंदरावांचा) नाविलाज झाला. तरीही दादांचे प्रेम व आशीर्वाद सतत पाठीशी हातेच. स्वत:चे घर सोडून फुले दांपत्याने जनाबचाचाकडे आश्रय घेतला. फातिमा, उस्मान ह्यांनीही त्यांना मदत केली. सावित्रीबाईंनी प्रशिक्षण घेण्यास सुरूवात केली, ज्यामुळे त्यांच्यात विश्वास निर्माण झाला. त्या स्वत: शाळा सांभाळू शकल्या. त्यांनी सामाजिक परंपरेला, चालीरीतीला प्रचंड हादरा दिला. वरच्या वर्गातील लोकांच्या मानाने तो धर्मद्रोह, समाजद्रोह झाला. समाजाच्या दृष्टीने अपवित्र, अपमानित, अमंगळ अशी घटना घडली. सनातन्यांचे डोके भडकले होते. वर्गातील पटसंख्या कमी होऊ लागली. लहुजी उस्तादांनी त्यांना मदत केली. विष्णुपंत थत्ते ह्यांनीही त्यांच्या कामात मदत करण्याचे ठरविले. मुंढव्याला नवीन शाळा निघाली. दक्षिणा प्राईज निधीतून अनुदान मिळण्यासाठी केलेल्या प्रयत्नांना यश आले. इतर सुधारक फक्त बोलके सुधारक होते. कृती मात्र शून्यवतच्च होती.

ते धाडसच त्यांच्यात उत्पन्न होत नव्हते. पण फुल्यांनी ते धाडस निर्माण केले. तत्कालीन लोकांच्या नाकावर टिच्चून त्यांनी सामाजिक कार्य पुढे चालू ठेवले. कामाचा व्याप सतत वाढत चालला होता. तरीही त्यांचे यशस्वी असेच फळ मिळत होते. दादोबा पांडुरंग तर्खडकरांनी (जे देशी शाळांचे पर्यवेक्षक होते) शाळा तपासणी केली. म्हणजेच जोतिबांच्य शाळा यशस्वी ठरत होत्या व प्राचार्य मेजर कँडी ह्यांच्या उपस्थितीत परीक्षा पार पडल्या होत्या. त्यांच्या यशस्वी कार्यामुळे त्यांना दक्षिणा निधीतून अनुदान मिळाले. आपले विचार परखडपणे मांडणारे मुक्तासारखे विद्यार्थी निर्माण होऊ लागले. आपल्यावर होत असलेल्या अन्यायाला वाचा फोडली व आपले विचार परखडपणे मांडण्यास सुरूवात केली आणि हेच जोतिबांना पाहिजे होते. त्यांना विद्यार्थ्यांना वैचारिक दृष्टीने मजबूत बनवायचे होते. रायनाकसारखे विद्यार्थी घडवून त्यांना खऱ्या सामाजिक परिस्थितीचे स्वरूप समजावून सांगायचे होते. फक्त पुस्तकी पंडित म्हणून नव्हे, तर विवेकी माणूस म्हणून आपल्या विद्यार्थ्यांनी जगावे, हीच त्यांची तळमळ होती.

### ३.२.५ स्त्रियांचा उध्दारकर्ता म्हणून सत्कार :

फुले दांपत्याच्या शिक्षणकार्याचा सर्वत्र बोलबाला झाला. त्यांच्या कार्याविषयी, विशेषत: शिक्षणकार्याविषयी सर्वांनाच आदर वाटू लागला म्हणून मेजर कँडी ह्यांनी त्यांचा गौरव करण्याचे ठरविल. सरकारी शिक्षण क्षेत्रातील थॉमस कँडी, थॉमस आर्स्केन, पेरी, कर्नल टेलर इत्यादी अधिकारी जोतिरावांच्या कार्याची प्रशंसा करीत होते. १६ नोव्हेंबर १८५२ रोजी जोतिबा फुले ह्यांचा जाहीर सत्कार करण्यात आला. सत्काराला उत्तर देताना जोतिबांनी खणखणीत आवाजाने सर्व सभा जिंकून घेतली. दीनदलितांना अज्ञानाच्या खाईतून काढायचे असेल, तर सर्व सुशिक्षितांनी शिक्षणाला महत्त्व देऊन त्या कामी पुढाकार घ्यावा असे ते आपल्या भाषणात म्हणाले. ह्या प्रसंगी दादांची त्यांना सारखी आठवण येत

होती. बोर्ड ऑफ एज्युकेशनचे अध्यक्ष जॉन वार्डन ह्यांनी शाळा पाहून मदत करण्याचे आवाहन केले. इमारत बांधण्यासाठी जागा मिळण्याचे ठरले.

### ३.२.६ हंटर शिक्षण आयोगापुढे सादर केलेले निवेदन :

जोतिरावांना म्हणजेच तात्यांना सर्वांसाठीच जलदीने सक्तीचे शिक्षण सुरू करायला पाहिजे, असे वाटत होते व त्यासाठी त्यांनी कंपनी सरकारकडे एक निवेदन पाठविले होते. कंपनी सरकारने शिक्षणाची जबाबदारी घ्यावी, शिक्षण सक्तीचे करणे आवश्यक आहे, प्राथमिक शिक्षणापेक्षा उच्च शिक्षणावर मोठ्या प्रमाणात खर्च होत आहे व त्यापासून ब्राह्मण उच्च वर्णीय फक्त सुशिक्षित बनत आहेत, सामान्य जनता मात्र ह्यापासून लांबच आहे. सामान्य जनतेची प्राथमिक हेळसांड थांबायची असेल, तर गोळा झालेल्या करातून शिक्षणासाठी उपयोग न होता तो वेगळ्याच कामासाठी खर्च होत आहे. शेतकरी व इतर वर्गातील लोकांना शिक्षणापासून दूर ठेवले जात आहे, शेतकऱ्यांच्या मुलांना व इतर समाजातील मुलांना शिक्षणाविषयी आवड निर्माण व्हावी म्हणून शिष्यवृत्त्या, सहामाही वा वार्षिक बक्षिसे दिली पाहिजेत, बाराव्या वर्षांपर्यंत तरी प्राथमिक शिक्षण सक्तीचे करण्यात यावे, पुरेशी वस्ती असलेल्या ठिकाणी स्वतंत्र शाळा उघडाव्यात, प्राथमिक शाळेत शिक्षक नेमताना ते प्रशिक्षित असेच नेमावेत, तसेच त्यांना १२ रुपयाहून कमी वेतन असू नये, अभ्यासक्रमात सर्वच विषयांचा समावेश असावा, परंतु त्याचबरोबर शेती, यांत्रिकी, नीतिबोध, आरोग्य ह्यांचाही समावेश असावा, शाळांची दर दोन महिन्यांनी तपासणी व्हावी, स्त्रियांमध्ये प्राथमिक शिक्षणाचा प्रसार मोठ्या प्रमाणात होईल, अशा प्रकारच्या उपाययोजना कराव्यात; असे विचार जोतिरावांनी आपल्या निवेदन पत्रातून कंपनी सरकारपुढे ठेवले होते. कारण प्राथमिक शिक्षणाची दुरवस्था त्यांच्यापुढे होती. त्यामुळे त्यानी सर्व परिस्थितीचा सांगोपांग विचार करूनच मग हे निवेदन सादर केले होते.

जोतिरावांबद्दल लोकांमध्ये असा गैरसमज होता की, ते ख्रिस्ती मिशनरींच्या बाजूने आहेत. परंतु शाळेत मुलांची ने-आण करण्यासाठी ज्या शिदबाची नेमणूक जोतिरावांनी केली होती, त्या शिदबाला ख्रिस्ती होण्यापासून त्यांनीच परावृत्त केले होते आणि त्याला जास्त पगार मिळावा म्हणून जगन्नाथ सदाशिवजी ह्यांच्याकडे पाठविले होते. त्याच्या पोटापाण्याचा प्रश्न त्यांनी स्वत: सोडविला होता. प्रत्येक व्यक्तीबद्दल तात्यांच्य मनात प्रेम होते. म्हणूनच ते त्यांचा प्रत्येक प्रश्न सोडवित असत.

## ३.२.७ 'तृतीय रत्न' नाटक :

आधुनिक मराठी नाटकातील पहिले नाटक म्हणून ज्याचा उल्लेख केला जातो, ते 'तृतीय रत्न' हे जोतिरावांचे (तात्यांचे) नाटक होय. ह्या नाटकात शिक्षणाबद्दलचे मत व ब्राह्मणी काव्याचे ब्रह्मकपट उघड करण्याचा प्रयत्न तात्यांनी केला आहे. १८५५ साली ते त्यांनी लिहिले. ब्राह्मणांची लबाडी उघडकीस आणण्यासाठी त्यांनी विदूषक, शेतकरी, शेतकऱ्याची पत्नी व भट ह्या पात्रांच्याद्वारे हे नाटक उभे केले. समुद्रमंथनातून जी चौदा रत्ने निघाली, त्यातील तृतीय रत्न म्हणजे लक्ष्मी होय. लक्ष्मी म्हणजे वैभव, संपन्नता आणि प्रतिष्ठा. हे सर्व ज्ञानार्जनामुळेच प्राप्त होते. लक्ष्मी म्हणजे वित्त होय आणि ह्या वित्तामुळेच अविद्येचा नाश होतो. म्हणूनच काकूंनी (सावित्रीबाईंना कादंबरीत काकू म्हणूनच संबोधले गेले आहे) 'तृतीय नेत्रा' ऐवजी 'तृतीय रत्न' हेच योग्य असे शीर्षक त्यास ठरविले. तात्यांना ते खूप आवडले. म्हणूनच ते म्हणतात,

''खरंच, फार चांगलं नाव सुचवलंत. पृथिव्यांत्रीणि रत्नानिजल अन सुभाषितम् । मुढै पाषाणखण्डेषु रत्न संज्ञांविधियते ॥ सुभाषितकारानं सांगितलं, ते खरंच आहे. पृथ्वीवर खरी रत्नं तीनच आहेत. पाणी, अन्न आणि सुभाषित (सुविचार). मूर्ख लोक दगडाच्या तुकड्याला रत्न म्हणतात. सावित्रीबाई, संस्कृत पोथ्यांमध्ये कधी-कधी चांगले विचारसुध्दा सापडतात ते असे.''[५]

अशा पध्दतीने त्यांनी कोंडिबा पाटलाच्या आग्रहाखातर व ब्राह्मणांच्या कपटी वर्चस्वाला बळी पडलेल्या लोकांना जागृत करण्यासाठी व शिक्षण घेणे कसे महत्त्वाचे आहे, हे पटवून देण्यासाठी ह्या नाटकाची उभारणी केलेली आहे.

## ३.२.८ मित्रात आलेले थोडेसे वितुष्ट :

म. फुले ह्यांचा पिंड मुळात क्रांतिकारक सुधारकाचा होता. आधुनिक भारतातील समाजक्रांतिकारक म्हणज म. फुले. ते द्रष्टे होते. म्हणूनच त्यांना शंभर वर्षांनंतरचा भारत दिसत होता. मुलांना शिक्षण देणे म्हणजे फक्त सुशिक्षित करणे नव्हे, तर त्यांना वैचारिक ज्ञानही द्यावे, ही त्यांची प्रबळ इच्छा होती. परंतु हेच कारण जोतिराव आणि त्यांचे मित्र ह्यांच्यात थोडा गैरसमज निर्माण होण्यास कारणीभूत ठरले. ही शिक्षणपध्दती त्यांच्या मित्रांना आवडत नव्हती. जोतिबांना वाटत होते की, माणूस म्हणून जगण्याचा आत्मविश्वासही भावी पिढीत निर्माण झाला पाहिजे आणि माणूस म्हणून जगताना माणुसकीच्या आड येणाऱ्या प्रत्येक गोष्टीचा उच्छेद करण्याचे शिक्षण आपण त्यांना दिले पाहिजे. मानवतावादी दृष्टिकोनातून कनिष्ठ वर्गातील लोकांच्या समतेकरिता आणि व्यक्तिस्वातंत्र्याच्या हक्काकरिता झगडण्यास तयार होणारी पिढी निर्माण केली पाहिजे. समाजातील चांगल्या-वाईट गोष्टींची कल्पना ह्या पिढीला झाली पाहिजे. हक्कासाठी लढण्याची व स्वत:चे संरक्षण करण्याची हिंमत तिच्यात निर्माण झाली पाहिजे. परंतु सदाशिव (सदाशिव बल्लाळ गोवंडे) हे नाराज होते. आपण राजकीय बाबतीत ज्याप्रमाणे बोलण्याचे पथ्य पाळतो, तसेच हिंदू धर्म आणि त्यांचे ग्रंथ ह्याविषयीही पाळावे, असे त्यांना वाटत होते. परंतु तात्या त्यांना समजावण्याचा स्वरात सांगतात,

''सर्वांच्या विचारानं शाळांचा कारभार चालावा, यासाठीच आपण या संस्था स्थापन केल्या आहेत. सर्व सभासद निर्भयाने आपली मतं मांडू शकतात. याबाबत माझं स्पष्ट मत आहे की, उच्च वर्णीय मुलींच्या शाळेतील आपलं शिक्षणाविषयीचं धोरण आणि शूद्र

अतिशूद्र मुलामुलींच्या शाळांतील शिक्षणविषयक धोरण एकच असू नये. त्यांना फक्त लिहिणं-वाचणं शिकवणं एवढाच आपला उद्देश असू शकत नाही. त्यांना शिक्षणाबरोबरच माणूस म्हणून जगण्याचा आत्मविश्वासही मिळवून दिला पाहिजे आणि माणूस म्हणून जगताना माणुसकीच्या आड येणाऱ्या प्रत्येक गोष्टीचा उच्छेद करण्याचं शिक्षणही आपण त्यांना दिलं पाहिजे. त्याशिवाय त्यांना आपले हक्क कळणार नाहीत आणि त्यांचं रक्षण करण्याची जाणीवही उपजणार नाही.''[६]

## ३.२.९ मारेकऱ्यांचा प्रसंग :

जोतिरावांच्या कार्याचा व त्यांच्या सुधारकी विचारांचा प्रभाव दिवसेंदिवस वाढू लागला. जोतिरावांची मते ही जहाल सुधारक अशी होती व ती सनातन्यांना, परंपरावादी लोकांनी, धर्ममार्तंडांना मानवणारी नव्हती. त्यामुळे सनातनी लोक चिडले होते. त्यात पुन्हा जोतिरावांचा शालजोड देऊन सत्कार करण्यात आला होता. ह्या सर्व गोष्टींनी जळफळाट होऊन धर्ममार्तंडांनी कट रचला होता. त्यांच्यावर मारेकरी धाडले होते. त्यांचा उद्देश जोतीरावांना आयुष्यातून उठवण्याचा होता. ह्या प्रसंगाचे वर्णन कादंबरीत पहिल्या भागात २६ व्या प्रकरणात आलेले आहे. ते असे : त्यांना (तात्यांना) झोप लागत नव्हती. सतत या कुशीवरुन त्या कुशीवरून करताना त्यांना एक काळी आकृती उतरताना दिसली. जोतिराव आपल्या अंथरुणावर उठून बसले. हातात फरशी कुऱ्हाड होती आणि तोंड ओळखू येऊ नये म्हणून तोडाला काळे केलेले होते. जोतिरावांना जीवनातून नाहीसे करायच्या उद्देशानेच ते आलेले होते.

''कोण तुम्ही ? काय पाहिजे तुम्हाला ?''

''तुजा जीव''

पण जोतिरावांनी त्यांचा उद्देश ओळखला होता. त्यांना माहीत झाले की, हे चोर नाहीत, तर ते मारेकरीच आहेत. त्यांना पैसे देऊन पाठविण्यात आले होते.

''मला ठार करून तुमचं भलं होणार असेल,तर जरूर मला ठार करा. आजवर तुमच्यासाठी झटलो. मरणसुध्दा तुमच्या भल्यासाठी येणार असेल, तर तेही मला आनंददायकच वाटेल. घ्या. आपली कामगिरी पार पाडा. परंतु माझ्या बंधूनो, मला फक्त एकच सांगा तुमची मुलं शाळेत जातात ?''[७]

निर्भिडपणे आणि शांतपणे जोतिरावांनी उच्चारलेले शब्द त्या दोन मारेकऱ्यांचे काळीज फाडून गेले. समाजोध्दाराकरिता, आपल्या सारख्या दीनदलितांच्या सुखाकरिता ज्या माणसाने अहोरात्र कष्ट केले, त्या पुण्यवान माणसाला आपण मारायला आलो आहोत, ह्याची त्यांना शरम वाटली. पश्चातापाने त्यांनी जोतिरांवाचे पाय धरले आणि क्षमा मागितली.

''थू-थू आमच्या जिनगानीला ! आमच्या पोराबाळांना शिकिवणाऱ्या देवमाणसाच्या जिवावर आमी उठलो ..... ''[८]

त्यांना पश्चाताप झाला होता. माणूसकीचा तो साक्षात् अवतार पाहून त्यांचे मन मोकळे-मोकळे झालं होते. त्यांनी आपली खरी-खरी माहिती सांगितली आणि हे दुष्ट कृत्य करायला ज्यांनी लाविले, त्यांना यमसदनास पाठविण्याची आज्ञा मागू लागले. पण तात्यांनी त्यांना सांगितले,

''नाही धोंडिबा, विचारही मनात आणू नका. त्यांनी एक चूक केली, म्हणून तुम्ही दुसरी चूक करु नका. त्यांना क्षमा करणं, हीच त्यांना मोठी शिक्षा ठरेल. आपलं अज्ञान हेच या अनर्थाला कारणीभूत आहे. ते दूर करण्यासाठी झटू या. कोणावर सूड घेऊन रक्तपात करून का आपली उन्नती होणार आहे ?''[९]

तात्यांनी ख्रिस्ती धर्माचा अभ्यास केला होता. त्यामुळे ते सांगतात, ''आपण काय करतो आहोत, हे त्यांना माहीत नसते. त्यांना देव क्षमा करू दे. अपराध्याला क्षमा करणे.

हाच सुडाचा उदात्त मार्ग आहे." जो काही प्रसंग घडला, त्याबद्दल कोठेही वाच्यता करू नका, असा सल्ला तात्यांनी त्यांना दिला. तात्यांची हत्या करण्यासाठी आलेले धोंडिराम नामदेव कुंभार व धोंडिबा रोढे हे दोघे होते. हे दोन्ही मारेकरी पुढे जोतिरावांचे निष्ठावंत भक्त बनले. रोठे हा जोतिरावांचा अंगरक्षक बनला, तर धोंडिराम नामदेव कुंभार हा मोठा पंडित झाला.

ह्याच प्रकरणात सावित्रीबाई माहेरी गेलेला प्रसंगही वर्णन केलेला आहे. सावित्रीबाई आजारी होत्या. त्यांना सतत तात्यांचीच काळजी वाटत होती. ह्याचवेळी सदुभाऊ जे सावित्रीबाईंचे भाऊ होते, ते आणि सावित्रीबाई ह्यांच्यात तू-मी झाली. सदुभाऊ माळकरी होता. त्याला अस्पृश्यांसाठी केलेले कार्य अजिबात पटत नव्हते. देवाब्राह्मणांच्या इच्छेविरुध्द गेलेले त्याला अजिबात आवडत नव्हते. म्हणून तो सावित्रीबाईंना व जोतिरावांना दूषणे देत होता. सावित्रीबाईही धाडसी होत्या. त्याला समजावून सांगत होत्या. शेळी गाय ह्या प्राण्यांना जवळ घेऊन कुरवळणाऱ्या, विषारी नागालाही दूध पाजणाऱ्या भाऊला त्यांनी शिक्षणाविषयी चे आपले मत सांगितले. विद्याहीन असलेला माणूस आणि पशू ह्यांच्यात काहीएक फरक नाही. अशाच अवस्थेत त्यांनी तात्यांना पत्र पाठविले होते व आपले काम निष्ठेने करावयास प्रोत्साहन दिले होते. यश आपलेच आहे, ही भविष्यातील घोषणा ही त्यांनी आत्ताच केली होती.

एकूण ह्या पहिल्या भागात जोतिबांच्या मनात चाललेले विचारसंक्रमण, विचार करण्यास प्रवृत्त झालेले त्यांचे मन, त्या विचारांचे प्रत्यक्ष कृतीत केलेले परिवर्तन, कार्य करताना आलेली अनेक संकटे, तरीही त्यांची असलेली जिद्द, सावित्रीबाईंचा असलेला पाठिंबा, ह्यामुळे व त्यांच्या कार्यनिष्ठेमुळे त्यांचा झालेला गौरव इत्यादी स्वरूपाचे कथानक दिसते.

### ३.२.१० दुसऱ्या भागातील कथानकाची सुरूवात :

दुसऱ्या भागाची सुरूवात होते ती असंतोषाने घुसमत असलेल्या इंग्रजाविरुध्दच्या उठावाने. ३१ मे १८५७ च्या उठावाचा बेत नक्की झाला होता. वेगवेगळ्या अफवा पसरत होत्या. त्याचा परिणाम जनतेवर होत होता. धर्मशास्त्राचा अपमान झाला, असे समजून न्हाव्यांनाही त्रास देण्यास सुरूवात झाली होती. न्हाव्यास्त्र उभारण्यात आले होते (म्हणजे न्हाव्यांनी हजामती करण्याचे बंड केले होते). काही दिवस ब्राह्मणांनी एकमेकांच्या हजामती केल्या. पण नंतर मात्र न्हाव्यास्त्राचाच विजय झाला. विधवांच्या जीवनाबद्दल खूप काही प्रत्यक्ष बघण्यास मिळत होते. जोतिरावांचे मन चिडून उठत होते. केशवपन केलेल्या विधवा स्त्रीच्या अंत्यसंस्कारास कोणीही जात नसत. रोजचेच तीळ-तीळ मरण ती सोसत होती. तिचे जीवन अत्यंत अपमानित, क्लेशदायक होते. तिला अशुभ, अमंगल मानण्यात येई. तिचे जीवन अत्यंत वाईट परिस्थितीत तिला जगावे लागत असे. दागिने घालणे, चांगले कपडे घालणे, हे तिला टाळावे लागे. कोणत्याही शुभ कार्यास जाण्यस तिला बंदी होती. एकूण काय, तर तिला स्वत:ची हौस करता येत नव्हती. समाजापासून दूर राहावे लागत असे. 'पांढऱ्या पायाची' म्हणून तिला बोलणी खावी लागत असत. विधवाविवाहाचा कायदा २५ जुलै १८५६ रोजी झाला होता. तरीही पुनर्विवाह करणे म्हणजे आपल्या घराण्याच्या प्रतिष्ठेला बाधा येते, असे समजले जाई. त्यामुळे विधवांचे विवाह होत नसत. ज्यांनी ही शास्त्रे लिहिली, त्यांचा ते आधार दाखवित. पातिव्रत्याचे महत्त्व सांगणारेच बायको मेल्यास तिचा अग्नी थंड होण्याच्या आधीच दुसरी बायको आणत होते, स्त्रियांबद्दल वाईट कृत्ये करत होते व आपणही त्याच स्त्रीच्या पोटी जन्मलो, हेही विसरत चालले होते. स्त्रियांना दयनीय अवस्थेत जीवन लागत होते. पुरुषांच्या वासनेला स्त्रिया बळी पडत होत्या. त्याचे परिणाम मात्र स्त्रियांनाच भोगावे लागत होते. त्यातूनच काशिबाईसारख्या स्त्रिया निर्माण झाल्या होत्या. काशिबाईला अशी जन्मठेपेची शिक्षा

झाली, तशी दुसऱ्या स्त्रीला होऊ नये, अशी मनोमन इच्छा तात्यांनी केली. विधवा स्त्रीची स्थिती त्यांना झोप येऊ देत नव्हती. ते सतत विचार करीत असत. स्त्रियांवरचा हा अन्याय थांबविला पाहिजे. पुन्हा भ्रूणहत्या होऊ नये, म्हणून त्यांनी सावित्रीशी चर्चा केली. सावित्रीकाकूही त्यांच्या मनातील सगळेच ओळखणाऱ्या होत्या, मनकवड्या होत्या व तात्यांना त्यांची सोबत होतीच. तात्या फक्त बोलके सुधारक नव्हते, तर कर्ते सुधारक होते.

### ३.२.११ 'बालहत्या प्रतिबंधक गृहा'ची स्थापना :

विधवांची ह्या सर्व विळख्यातून सुटका करावयची असेल, तर त्यावर एकच उपाय आहे आणि तो म्हणजे बालहत्या प्रतिबंधक गृहाची स्थापना करणे. तात्यांनी इ.स. १८६३ मध्ये ही संस्था निर्माण केली. ही भारतातील पहिलीच अशी संस्था आहे. ह्या अगोदर कोणीही असे धाडस केले नव्हते.

"..... विधवा भगिनींनो, अज्ञानपणाने वाकडे पाऊल पडून गर्भ राहिला असेल, तर जोतिराव गोविंदराव फुले यांच्या घरी येऊन सुरक्षितपणे बाळंत व्हा, बाळंतिणीचे नाव गुप्त राखण्यात येईल. हवे असल्यास मूल घेऊन जा किंवा नको असल्यास ठेवून जा. हे तुमच्या खुशीवर अवलंबून राहील. त्यांचा संभाळ आम्ही करू"[१०]

अशी त्याकाळी म. फुल्यांनी जाहिरात केली व सर्व मोक्याच्या व तीर्थस्थानी लावली. त्यांनी सर्व विधवा स्त्रियांच्या आयुष्याची जबाबदारी आपल्या हाती घेतली होती. 'अनाथ बालाश्रम' सुरू करण्याची कल्पना त्यांनी सत्यात आणली होती आणि हीच सगुणाआउला (तात्यांच्या मावसबहिणीला, जिने म. फुल्यांना लहाणपणापासून मुलाप्रमाणे सांभाळले होते) खरी श्रध्दांजली ठरली. गोदावरीने (विधवा स्त्री) शांतारामला (तात्यांच्या अनाथआश्रमातील एक विधवेचा मुलगा) येथेच जन्म दिला. स्वतःच्या कुटुंबाचा व एवढा सर्व खर्च चालविण्यासाठी जोतिरावांना काहीतरी उद्योगधंदा हवाच होता व तो त्यांना मिळाला. खडकवासल्याच्या तलावाच्या बांधकामाला लागणारे दगड पुरविण्याचा ठेका

त्यांना मिळाला. त्यांच्या कार्याबद्दल सुधारकांनी त्यांना सक्रिय मदत पाठविली. तात्यांचे एक सत्यशोधक कार्यकर्ते सखारामतात्या भेटण्यास आले होते. एकूणच त्यांच्या कामाची प्रशंसा सगळीकडे होत होती.

### ३.२.१२ दुसऱ्या लग्नास नकार :

जोतिराव म्हणजेच तात्या व सावित्रीबाई म्हणजेच काकू ह्यांना स्वत:चे मूल नव्हते व गोविंदरावांची म्हणजेच दादांची शेवटची इच्छा होती की, तात्यांनी दुसरे लग्न करावे म्हणजे त्यांना मूल होईल. तात्यांनी मात्र दुसऱ्या लग्नास साफ नकार दिला होता. वंशाच्या दिव्यासाठी चाललेली दादांची खटपट पाहून तात्यांना त्यांची कीव येत होती. मूल न होणे, हा फक्त स्त्रियांचाच दोष नसून तो पुरुषांचाही असू शकतो, असा त्यावेळी विचार करणारे तात्या होते. म्हणूनच ते म्हणतात, ''सदुभाऊ ! एखाद्या जोडप्याला मूल होत नसेल, तर त्याचा दोष एकट्या स्त्रीकडे कसा ? एकट्या स्त्रीला वांझपणाचा दोष लावणं, हा निर्दयपणा आहे. नवऱ्यात वांझपणाचा दोष नसेल कशावरून?''[११]

तात्या ह्याही पुढे जाऊन म्हणतात, ''मूल नसलेल्या जोडप्याला स्त्रीनं मी दुसरा नवरा करणार आहे, असं म्हटलं, तर तिच्या नवऱ्याला काय वाटेल ? त्याला तो अपमान वाटणार नाही का ? त्याचप्रमाणे पुरुषानंही दुसऱ्या लग्नाचा विचार करताना पत्नीला काय वाटेल, याचा विचार करायला नको का ?''[१२]

मूल नाही, हा दोष फक्त सावित्रीवर ढकलणे तात्यांना योग्य वाटत नव्हते. दुसरे लग्न करणे हीनपणाचे व माणुसकीला न शोभणारे कृत्य त्यांना वाटत होते. स्त्री दुसऱ्या लग्नाचा विचारही करू शकत नाही, तर मग पुरुषांनी तर का असा विचार करावा, हे लक्षात घेऊन तात्यांनी दादांची मागणी धुडकावून लावली.

तुकारामतात्यांशी झालेल्या चर्चेतून जोतिरावांनी 'एक हिंदू' हे पुस्तक छापून घेतले. धरणाच्या कामात पिराजीची ओळख झाली. असेच एकेदिवशी हरी रावजी शिंदे ह्यांचीही ओळख झाली. त्यालाही त्यांनी भोलागीरमहाराजांच्या पेढीवर कामाला ठेवले.

### ३.२.१३ दादांचा अखेरचा निरोप :

तात्यांनी केलेल्या कार्यामुळे दादा तात्यांवर चिडले असले, तरी त्यांना तात्यांविषयी खूप प्रेम वाटत होते. म्हणूनच त्यांनी शेवटी जगाचा निरोप घेताना तात्यांना आपल्या घरात राहण्यास बोलविले. खूप दिवसांनी का होईना, दादांना त्यांच्या कार्याचे महत्त्व समजले होते. परंतु दादा मात्र जगाचा निरोप घेऊन गेले होते. त्यांच्या मृत्यूने तात्यांना खूप दुःख झाले. पण तात्यांनी सर्व क्रियाकर्म करताना ब्राह्मणी वर्चस्व बाजूला ठेवले होते. पिंडदानाचे अन्न त्यांनी अनाथांच्या व अपंगांच्या भुकेल्या पोटात घातले व त्यांचा आत्मा शांत केला. आजही इतका सुधारणावादी विचार करणारा माणूस आपणास आढळणार नाही, ते त्यांनी त्यावेळी केले. तात्या परत आपल्या घरी राहण्यास आले.

### ३.२.१४ अतिशूद्रांसाठी आपली विहीर खुली केली :

तात्यांनी अनेक देशांच्या इतिहासाचे वाचन केलेले होते. 'आपल्याच देशात माणसालाच हाडवैरी समजून त्याच्यावर अन्याय करण्याची प्रथा होती. ब्राह्मण हे मूळचे येथील नाहीतच. त्यांनीच येथील क्षत्रियांवर हल्ले करून त्यांना आपले गुलाम करून घेतले आहे व त्यांच्यावर नाना प्रकारचे अत्याचार करीत आहेत. अत्याचार हा समाज भोगतो आहे. त्याला शिक्षणापासून लांब ठेवण्यात आले आहे', असे विचार करीत तात्या घरी येत होते, तर त्यांना समोरच्या विहिरीवर एक दृश्य दिसले. ब्राह्मण लोक विहिरीतील पाणी संपवीत होते. दुसऱ्या विहिरीवर शूद्रांचे लोक पाणी भरत होते व तेथेच अतिशूद्र पाण्यासाठी याचना करीत होते. इतर लोक मात्र त्यांच्यावर ओरडत होते. पाण्यासाठीचे त्यांचे हाल तात्यांनी जवळून पाहिले, ऐकले. त्यांनी त्या घोळक्याकडे बघितले. तात्यांनी सर्वांना

वाड्यावर आणले. त्यांना फक्त पाणी दिले नाही, तर नाईकांची (उमाजी नाईक ह्यांचे वडील) घागर विहिरीत सोडली ही क्रांतीच होती. प्रथमच असे घडले होते. एका अतिशूद्राची घागर तात्यांनी प्रथमच विहरीत सोडली होती. हेच त्यांचे क्रांतिदर्शी विचार होते. त्यांनी आपली विहीर कायमचीच लोकांना खुली करून दिली. माणसांच्या झुंडीच्या झुंडी पाण्यासाठी तात्यांच्या घराकडे येऊ लागल्या.

### ३.२.१५ शिवाजी महाराजांच्या समाधीचा शोध :

तात्यांना प्रथमपासून वेगवेगळी चरित्रे वाचण्याची आवड होती. त्यांनी पुन्हा एकदा शिवचरित्र वाचण्यास घेतले होते. शेतकऱ्यांचा राजा असलेले शिवाजीराजे ह्यांनी हिंदुस्थानमधल्या पातशह्यांना जेरीस आणून आपल्या स्वतःच्या बळावर स्वराज्य स्थापन केले होते. अशा राजाचे कर्तृत्व वाचून तात्यांचे भान हरपून गेले. ते सारखे शिवाजीराजांच्या धोरणाचा व कर्तृत्वाचाच विचार करू लागले. स्वराज्याची स्थापना केलेल्या राजाच्या समाधीचे दर्शन रायगडावर जाऊन घ्यावे, अशी इच्छा त्यांच्या मनात पुनःपुन्हा निर्माण होत होती. म्हणून ते रायगडावर गेले. परंतु तेथे त्यांना समाधीचा ठावठिकाणा दिसेना. तेव्हा त्यांनी गडावरील माणसांना विचारले, चौथऱ्या विषयी चौकशी केली. चौथरा दाट झाडीत असल्यामुळे चौथऱ्यापर्यंत पोहोचणे अवघड होते. म्हणून तात्यांनी स्वतः कुऱ्हाड मागवून घेतली व दिवसभर झाडे तोडण्याचे काम करीत राहिले. दोन-तीन दिवस हे काम केल्यानंतर शेवटी त्यांना समाधीचे दर्शन झाले. त्यांना खूप-खूप आनंद झाला. तात्यांनी केलेल्या पूजेस गावजोश्यांनी विरोध केला. कारण त्याला दक्षिणा देण्याऐवजी त्यांनी हा सर्व पूजाविधी उरकला होता. तात्या तेथे गप्प बसले. तेथून ते पुण्याला आले आणि त्यांनी पोवाडा रचण्यास घेतला. तात्या इतिहासात गर्क झाले. इतिहासातील अनेक प्रसंगांशी ते एकरूप झाले. शिवाजी राजांनी घडविलेले प्रसंग जसेच्य तसे तात्यांसमोर उभे राहू लागले.

## ३.२.१६ शिवाजी महाराजांचा पोवाडा :

शिवाजीमहाराजांचा पोवडा करत असताना तात्यांपुढे वर्ग होता तो कुणबी, माळी महार, मांग ह्यांचा. त्यांच्या उपयोगी पोवाडा पडावा, असाच त्यांचा हेतू होता. तात्यांनी ग्रँड डफच्या 'हिस्टरी ऑफ मराठाज्' ह्या पुस्तकाचा अभ्यास करून पोवाड्याची रचना केली. पोवाड्याच्या शेवटी जे वर्णन केलेले आहे, ते मात्र त्यांनी कुठलाही आधार न घेता स्वत:च केलेले आाहे. हा पोवाडा एकूण आठ भागांमध्ये विभागलेला आहे.

''कुळवाडीभूषण पोवाडा गातों भोसल्याचा ।

छत्रपती शिवाजीचा ॥

लंगोट्यास देई जानवी पोशिंदा कुणब्यांचा ।

काळ तो असे यवनांचा ॥''[१३]

दुसऱ्या भागात 'जो पाण्यात राहणारा मासा, त्याला पोहण्यास शिकवण्यास गरू कशाला हवा', असा प्रश्न उपस्थित करून दादोजी कोंडदेव ह्यांचे गुरुत्व तात्यांनी नाकारले आहे. शेवटी इंग्लंडच्या राणीला उद्देशून गाऱ्हाणे सांगितले आहे ते असे :

''सत्ता तुझी राणीबाई, हिंदुस्थान जागृत नाहीं ।

जिकडे तिकडे ब्राह्मणशाई डोळे उघडून पाही ॥

चहुंकडे भटभाई कुणब्याची दाद नाही .

जोती म्हणे धांव घेई । दुष्टापासुनी सोडवी ॥''[१४]

राणीपुढे तत्कालीन समाजरचनेचे व ब्राह्मणी वर्चस्वाचे वर्णन तात्यांनी केलेले आहे व 'तूच आता त्यांना सोडवू शकतेस'; असे म्हटले आहे. नंतर तात्यांनी हा पोवाडा 'सत्यदीपिके' त छापण्यासाठी पाठविला व धोंडिराम शाहीर ह्यांच्या आग्रहाखातर 'दक्षिणा प्राईज कमिटी'कडेही पाठविला. सर्वांनाच तो आवडला, असे नाही. पण जे सूज्ञ होते, त्यांना मात्र तो आवडला.

## ३.२.१७ 'ब्राह्मणांचे कसब' :

तात्यांनी धोंडिराम शाहीर ह्याला दिलेले आश्वासन पाळण्यासाठी 'ब्राह्मणांचे कसब' हे पुस्तक लिहिण्यास घेतले. त्यांनी कुणबी, माळी, मांग महार ह्यांना ते अर्पण केले आहे. आपल्या समाजावर ब्राम्हणांचे वर्चस्व कसे व किती आहे, ते आपल्या समाजावर कसा अन्याय करतात, आपल्या मतलबी धोरणासाठी कसा कावा करतात आणि बाजीराव पेशव्यांच्या वेळचेच राज्य अजूनही त्यांना कसे हवे आहे, हे सर्व तात्यांनी ह्या पुस्तकात सांगितले आहे. भटशाहीच्या विळख्यातून शूद्र-अतिशूद्र ह्यांना सोडविण्यासाठी तात्यांनी हा ग्रंथ लिहिला. कावेबाज ब्राह्मणी वृत्तीवर हल्ला करताना ते म्हणतात,

''जळो जळो तुमचे जिणे
उद्योगाआधी ताजे खाणे''

''बामनी कावा । समजुनी घ्यावा ।
आहेत आकलेचे खबरदार
शहाणे ठक आरपार''[१५]

कृष्णराव पांडुरंग भालेकर ह्यांची तात्यांशी ओळख झाली ती त्यांना असलेल्या नाटकाच्या प्रेमातून. रावसाहेबांची (न्यायमूर्ती महादेव रानडे ह्यांची) व त्यांचीही भेट झाली. तात्यांच्या कार्यामुळे त्यांच्यात स्नेह वाढत चालला. तात्यांच्य भेटीसाठी रावसाहेब आल्यानंतर सुधारणेविषयी गप्पागोष्टी झाल्या. तात्यांनी मूळ विषयाला हात घातला. रावसाहेबांची बहीण दुर्गाबाई विधवा झाली होती. तिचा पुनर्विवाह व्हावा, असे तात्यांना वाटत होते म्हणून तात्या रावसाहेबांना सांगतात,

'रावसाहेब, दुर्गाबाईंना विधवेचं जिणं जगायला भाग पाडू नका.' परंतु रावसाहेब स्वत: सुधारक असूनही काहीही बोलत नव्हते. तात्या म्हणाले, ''समाजात ज्या सुधारणा झाल्या पाहिजेत, असं तुम्ही म्हणता, त्या स्वत: आचरणात आणायला तुम्ही का कचरता ?

जे घडलं पाहिजे, असं तुम्ही म्हणता, ते स्वत: करून दाखवायची संधी तुम्हाला मिळाली आहे. रावसाहेब, ही संधी सोडू नका. दुर्गाबाईचा पुनर्विवाह घडवून आपले बोल खरे करा.''[१६]

रावसाहेबांनी पुनर्विवाहास केवळ पाठिंबा दिला, तरी त्यांना वाळीत टाकण्यात आले होते. बहिणीचा पुनर्विवाह जर केला, तर काय संकटे येतील, ह्याची त्यांना कल्पनाच करवत नव्हती. म्हणून तात्या त्यांना म्हणतात,

''झगडा दिल्याशिवाय कुठलीही चांगली गोष्ट कधी साध्य झाली आहे का, रावसाहेब ? सामाजिक सुधारणा आपोआप घडणार नाहीत. त्या घडवाव्या लागतील. विधवाविवाह झाले पाहिजेत, हे तुम्हाला पटलं आहे ना ? मग धैर्य दाखवून हा पुनर्विवाह घडवा. त्याच वेळी लोकांच्या मनावर त्या सुधारणेचं महत्त्व ठसेल.''

सर्व ब्राह्मण आमच्या घरावर बहिष्कार टाकतील, असेच रावसाहेबांना वाटत होते. पण तात्या तडकाफडकी निर्णय घेणारे होते. त्यांना कृती महत्त्वाची वाटत होती. फक्त बोलून सुधारणा होत नसतात. म्हणून तात्या म्हणतात,

''मग रावसाहेब, आपलं हे सुधारकाचं ढोंग पुरं करा.'' तात्यांचे असे तडकाफडकी बोलणे काकूंनाही आवडले नव्हते. परंतु तात्या आपल्या निर्णयावर ठाम असत. बोलके सुधारक आणि कर्ते सुधारक ह्यामधील हाच तर फरक असतो. शाळेच्या कामाचा व्याप वाढलेला असूनही तात्या लिखाण करीत होते. 'शूद्रांनी ब्रह्मराक्षसांच्या दास्यत्वातून असे मुक्त व्हावे,' ह्या शीर्षकाखाली त्यांनी शूद्रांना आपल्या खऱ्या हक्कांची जाणीव व्हावी म्हणून लिहिले होते. परंतु 'लोककल्याणेच्छु' ह्या वर्तमानपत्राने ते नाकारले. पण तात्यांनी नंतर ते 'शुभवर्तमानदर्शक' कडे पाठविले. तेथे ते प्रसिध्द झाले. तात्या लिखाणात जसे गढून जात, तसेच लहान मुलांतही रमत. तात्यांनी काकूंनाही सुधारणा करण्यास पूर्ण स्वातंत्र्य दिले होते. त्यामुळेच त्यांनी सदाशिवराव गोवंडे ह्यांची पत्नी सरस्वतीबाई ह्यांना बरोबर घेऊन 'स्त्री

विचारवती सभे'ची स्थापना केली होती. काकूंचे व तात्यांचे कौटुंबिक जीवन सामाजिक कार्यात अशा प्रकारे संलग्नअसेच होते.

### ३.२.१८ 'गुलामगिरी' :

म. फुले ह्यांचा 'गुलामगिरी' हा ग्रंथ इ.स. १८७३ मध्ये प्रसिध्द झाला. तात्यांनी हा ग्रंथ लिहिताना एकूण भारतीय समाज डोळ्यासमोर ठेवला होता. भारतीय समाज हा अंधश्रध्दा, धार्मिक रुढी, गुलामगिरी ह्यातच खितपत पडलेला आहे. तात्यांना सामाजिक व मानसिक गुलामगिरी नष्ट करावयाची होती. त्यासाठी प्रथम समाजाला शिक्षण देणे तात्यांना महत्त्वाचे वाटत होते. 'गुलामगिरी' ह्या ग्रंथातून तात्यांनी हेच सुचविले आहे. अॅब्राहम लिंकन ह्यांनी इ.स. १८६३ ला निग्रोंची गुलामगिरी नष्ट केली होती. त्यांनी मानवी स्वातंत्र्यासाठी हे स्फूर्तिदायक असे कार्य केले होते. म्हणून 'गुलामगिरी' हा आपला ग्रंथ तात्यांनी अब्राहम लिंकन ह्यांना समोर ठेवून लिहिला होता. अमेरिकेतील निग्रोंना मुक्त करणाऱ्या वीरांना त्यांनी आपला हा ग्रंथ अर्पण केला. सोळा प्रकरणांमध्ये हा ग्रंथ विभागलेला आहे. ब्राह्मणी वर्चस्व कसे आहे, ह्याचे चित्रण नऊ प्रकरणांमध्ये केलेले आहे. ग्रंथाची सुरूवात त्यांनी होमरच्या ''ज्या दिवशी मनुष्य गुलाम होतो, त्या दिवशी त्याचा अर्धा सद्‌गुण लोपतो,'' ह्या प्रसिध्द वचनाने केलेली आहे. 'गुलामगिरी' हा ग्रंथ समाजजागृतीसाठी रांगड्या भाषेत तात्यांनी लिहिलेला आपणास दिसून येतो. देशातील अस्पृश्यतेचे भूत नाहीसे करून दलितांवरील अन्याय नष्ट करणे, हाच मुख्य उद्देश त्यांचा हया लिखाणापाठीमागे होता.

'मनी वसे ते स्वप्नी दिसे' ह्या उक्तीनुसार तात्यांच्या मनात दिवसभर जे जे विचार चालू असत, तेच विचार रात्री त्यांच्या स्वप्नात दिसत असत.झोपही शांत मिळत नव्हती. त्यामुळे तात्या जागे झाले व त्या शांततेच्या वेळीच त्यांना विराट विश्वाने साद घातली. ईश्वर एक नियामक शक्ती ज्याने हे विराट आकाश, तेजोमय ग्रहगोल, निसर्गचक्राचे सातत्य

निर्माण केले, त्याच्याविषयी तात्यांच्या मनात आदर निर्माण झाला. त्यातून सहजच तुकोबांचे शब्द फुलून आले,

"तू करुणेचा सागर, देवा तुजलाचि दु:ख सांगावे !
तुजवाचुनि इतरांसि दीनमुख परसरोनी काय मागावे ॥"[१८]

## ३.२.१९ 'सत्यशोधक समाजा'ची स्थापना :

तात्या खूप विचार करीत होते. माणूस हा इतर प्राण्यांपेक्षा वेगळा ठरतो तो त्याच्या बुध्दीमुळे. ह्या बुध्दीच्या योगातून त्याने सर्व प्राणिमात्रांना सुखी करावयास हवे. परंतु ह्याच बुध्दीच्या जोरावर त्याने सत्ता मिळविली व माणसांना गुलाम बनविले. आपल्या स्वत:च्या स्वार्थासाठी स्वत:च ग्रंथ निर्माण करून त्यातून आपला स्वार्थ साधला. हे वर्चस्व प्रस्थापित झालेले वर्णश्रेष्ठ लोक त्यांच्यातही मूर्ख असतातच की, तरीही त्यांनाच श्रेष्ठत्त्व प्राप्त झाले. सुख तेवढे त्यांनी आपल्या बाजूला घेतले आणि इतर समाजाला मात्र त्यांनी दु:खात लोटले, त्यांना जनावरासारखी वागणूक दिली. वस्तुत: हे विश्व सर्वांसाठी आहे. त्याच्यातील वस्तूंचा उपभोग घेण्याचा अधिकार सर्वांना आहे. परंतु हे झाले नाही. परमेश्वर आणि भक्त ह्यांच्या मध्ये आलेल्या मध्यस्थालाच जास्त महत्त्व येत गेले. म्हणून अनेकजण वेगवेगळ्या धर्माकडे आकर्षित होऊ लागले. त्यांना खरा धर्म जो मानवता हा तो समजून सांगितला पाहिजे, असे तात्यांना वाटू लागले. प्रत्येकाच्या इच्छेने येथे निर्माणकर्त्याची भक्ती करावी, हाच विचार त्यांच्या मनात चालू होता. त्यांच्या विचारांचे रूपांतर 'सत्यशोधक समाज' स्थापनेच्या वाटचालीकडे होत गेले.

आपल्या आयुष्यातील प्रत्येक क्षणनूक्षण तात्यांनी समाजसेवेसाठी खर्च केला होता. 'ब्राह्मणाचे कसब', 'गुलामगिरी' ह्यासारखे ग्रंथ निर्माण करून समाजजागृतीचे विचार त्यांनी तिखट भाषेत समाजापुढे मांडले होते. पुन्हा एकदा थॉमस पेनच्या विचारांकडे तात्या वळले. ख्रिस्ती बांधवांची धर्मगुरूच्या जुलमापासून सोडवणूक करायची असेल, तर धर्मविचारांचा

नवा दीपस्तंभ उभा करणे जरुरीचे होते. तात्यांची स्वत:ची अशी एक मतप्रणाली होती, एक पोषक असे धोरण होते, तत्त्वज्ञान होते. त्याच्या आधारेच ते आपले कार्य करीत असत. त्यांच्यासारख्याच विचारांच्या आणखी काही लोकांना एकत्रित करून त्यांनी सत्यशोधक समाजाची २४ सप्टेंबर १८७३ रोजी स्थापना केली. महाराष्ट्रातील ही पहिलीच अशी समाजक्रांती करणारी संस्था आहे. शूद्र-अतिशूद्र ह्यांची मानसिक गुलामगिरीतून मुक्तता करणे, पुरोहितांकडून होणाऱ्या अन्याय-अत्याचारांपासून त्यांना मुक्त करणे, हेच ह्या समाजापुढचे ध्येय होते. सत्यशोधक समाजाची तत्त्वे पुढीलप्रमाणे होती :

१) ईश्वर एक असून तो सत्यरूप आहे. तोच जगातील सर्व प्राणिमात्रांचा पिता आहे.

२) आईच्या भेटीसाठी अगर बापाला प्रसन्न करण्यासाठी ज्याप्रमाणे कोणा मध्यस्थाची गरज नसते, त्याप्रमाणे परमेश्वराच्या प्रार्थनेसाठी कुठल्याही धर्मगुरूची आवश्यकता नाही.

३) मनुष्य जातीने श्रेष्ठ ठरत नसून तो गुणांनी श्रेष्ठ ठरतो.

सत्यशोधक समाजाची एक प्रतिज्ञाही असायची. सर्व क्षेत्रपालांचा जयजयकार करून मगच त्यांची प्रतिज्ञा ते म्हणत. ह्या समाजाच्या नंतर अनेक शाखा निर्माण झाल्या. व्यापक अशा स्वरूपाची तत्त्वे समाजापुढे मांडलेली होती. त्यात लग्न करताना वायफट खर्च करू नये, अल्प खर्चात लग्न करावे, दारुबंदी असावी, सक्तीचे शिक्षण असावे, अंधरुढी व जातिभेद ह्यांना विरोध करावा इ. तत्त्वांचा अंतर्भाव होता. प्रत्येकजण आता आत्मविश्वासाने जगेल, आपआपला उचित मार्ग निवडण्यास तो मोकळा असेल, त्याला कोणाच्याही ताबेदारीत राहावे लागणार नाही, अशी समाजाला खात्री वाटत होती.

'ईश्वराची भक्ती करायची असेल, तर ती फक्त संस्कृत भाषेतूनच आणि त्यासाठी मंत्र असतात ते संस्कृतमध्येच. त्यांच्याच द्वारे ईश्वराची प्राप्ती होते', अशी तत्कालीन लोकांची भावना होती. ईश्वर प्राप्त करण्यासाठी कोणती भाषा आवश्यक आहे, हे त्यांना तात्यांकडून जाणून घ्यायचे होते. तात्या त्या लोकांना म्हणाले, ''जगात इतर कुठल्याही

देशात संस्कृत भाषा नाही. ते लोक आपाआपल्या भाषेतच देवाची प्रार्थना करतात. ईश्वर हा सर्वसाक्षी, सर्वज्ञानी आहे. तुमच्या मनात काय चाललं आहे, हे त्याला कळते, त्याला तुमची प्रार्थना कळणार नाही का ? असं पाहा, पापी लोकांनी संस्कृत सोडून दुसऱ्या भाषेत खोटं बोलायचं, पाप केलं किंवा पापी विचार केले, तर देवाला संस्कृतशिवाय दुसरी भाषा येत नसल्यानं तो त्यांना पापी ठरवू शकणार नाही, असं तुम्ही म्हणणार का ?"[१९] तात्यांनी हे ही सांगितले की, धार्मिक ग्रंथांचे खरे स्वरूप जर उघडकीस आणायचे असेल, तर हिंदी, इंग्रजी शिका व ज्ञानी व्हा.

### ३.२.२० यशवंताचा जन्म :

यशवंत जो तात्यांचा व काकूंचा दत्तकपुत्र, त्याचा जन्म काशिबाई नावाच्या केसोपंत सिंदीच्या वाड्यात राहणाऱ्या एक विधवेच्या पोटी झाला. काशिबाई त्याला मारायलाच तयार झाली होती. कारण समाजात अशा मुलांची काय स्थिती होईल, ह्याची तिला कल्पना होती. पण काकूंनी तिला 'तुझ्या मुलाला आपल्या मुलासारखे नव्हे, तर मुलगाच म्हणून सांभाळेन', असे सांगितले, तेव्हा कोठे तिने हे मूल त्यांच्याजवळ दिले. ती अधूनमधून यशवंताला पाहण्यास येई. पण तात्यांना मात्र भेटत नव्हती. काकूंनी आणलेल्या ह्या पाहुण्याचा नामकरण विधी त्यांनी व तात्यांनी मिळून केला. वैऱ्यावरही प्रेम करायला शिकवणाऱ्या येशूच्या नावाने त्यांनी त्यास हाक मारण्यास सुरूवात केली. हाच येशू पुढे यशवंत झाला.

### ३.२.२१ विधुराचा पुनर्विवाह :

विधुराचे जीवन जगत असलेल्या सीताराम आल्हाट ह्या तरुणाचे लग्न करून द्यावे, असे तात्यांना सारखे वाटत होते. तात्यांनी त्याच्यासाठी आपल्या गल्लीत राहणाऱ्या ग्यानबा निंबणकर ह्यांची मुलगी राधा ही पाहून ठेवली होती. लोकांना मात्र हे लग्न होऊ नये, असे वाटत होते. त्यामुळे मुलीच्या वडिलांना-ग्यानबा निंबणकर ह्यांना लोक काहीतरी सांगून त्या

निर्णयापासून परावृत्त करण्याचा प्रयत्न करीत होते. तात्यांनी मात्र माघार घेतली नाही. मुलीची आई स्वत: लग्नाच्या बाजूने खंबीरपणे उभी होती. ह्या लग्नामुळे तात्यांच्या फुले मंडळीतील अनेकजण त्यांना येऊन मिळाले होते. त्यांच्या कार्यात सहभागी झाले होते व सत्यशोधक समाजाचे सभासदही झाले होते.

परंतु ह्याचवेळेस तात्यांच्या बरोबरीने काम करणाऱ्या रावसाहेब रानडे ह्यांनी आपली पहिली पत्नी मृत्यू पावताच लगेच महिन्याच्या आतच बत्तिसाव्या वर्षी अकरा वर्षाच्या मुलीशी लग्न केले होते. कारण त्यांच्या वडिलांच्या इच्छेविरूध्द त्यांना जाता आले नाही. ते फक्त बोलके सुधारक होते.

ह्याच दरम्यास धोंडिबा शाहीर ह्यांना ब्राह्मणांच्या धर्माविरूध्द बोलतो म्हणून पोलीस चौकीवर नेण्यात आले होते. पण तात्यांनी पोलिसांना सांगितले की, तो जे कवने गातो, ती मीच रचलेली आहेत. मग मलाच अटक करा.

गावातील लोक तात्यांची अशीच परीक्षा पाहत असत. त्यांना आपल्या घरी बोलावीत व त्यांची फजिती करण्याचा बेत आखीत. पण स्वत:च फटफजीत होत असत. असेच एकदा तात्यांकडे दोन व्यक्ती येतातव त्या म्हणतात, ‘‘तात्यासाहेब, सत्याचा शोध करून तुम्ही सत्यशोधक झाला आहात, तर आपल्या अंतर्मनात शोध घेऊन आमच्या मुठत काय आहे, ते सांगा.’’[२०] त्या व्यक्ती आल्यापासून तुळशीच्या पाल्याचा वास येत होता. म्हणून तात्यांनी तर्क केला व सांगितले, ‘‘मी सत्यशोधक आहे. जादूटोणेवाला नाही. त्यामुळं जादू करून मी काही सांगू शकणार नाही. पण एवढं सांगू शकतो की, तुमच्या हातात तुळशीची पानं आहेत.’’[२१]

यशवंताचे दत्तकविधान करून तात्यांनी यशवंताच्या आईला दिलेले वचन पाळले होते. त्यामुळे त्यांच्या भाऊबंदाशी त्यांचे थोडे वैरही निर्माण झाले होते. पण तात्या संकटाला भिणारे नव्हते. म्हणूनच त्यांनी आपला नोकर ग्यानोबा ह्याच्या लग्नाचे आव्हान

स्वीकारले होते व ते त्यांनी मोठ्या कष्टाने पार पाडले होते. ग्यानोबाला अनेकजण म्हणत, ''तू जर समाजामार्फत लग्न करशील, तर तुझं पाणी बंद करून तुझ्या दारी हाडूक रोवू.''[२२] ह्यामुळे ग्यानोबा भिलेल्या अवस्थेतच होता. त्याची समजूत घालताना तात्या म्हणतात, ''ग्यानोबा, ही पेशवाई नाही. आता इंग्रज बहाद्दरांचं राज्य आहे. तू त्यांना भिऊ नकोस.''[२३]

ग्यानोबाचे लग्न होताच तात्या सत्यशोधक समाजाच्या शिष्यवृत्त्या व मॅट्रिकच्या परीक्षेत प्रथम क्रमांक मिळविणाऱ्या विद्यार्थ्यास सोन्याचं पदक दिलं जाईल, असं जाहीर करतात. परंतु इकडे यमू त्यांचा धोसरा काढते व आजारी पडून शेवटी सर्वांना सोडून जाते. यशवंताची आई क्षयाने आजारी होती. खूप इलाज करूनही शेवटी तिचाही मृत्यू होतो.

### ३.२.२२ वृध्दाविषयी कणव :

सत्यशोधक समाजाचा प्रचार करण्यासाठी व समाजजागृती करण्यासाठी तात्या आळंदीला जाण्याचे ठरवितात. कडक ऊन असते. अंगाची नुसती लाहीलाही होत असते. घशाला कोरड पडत होती. आळंदीला जाणाऱ्या वारकऱ्यांमध्ये एक वृध्द होता. तो तशाही अवस्थेत चालत होता. परंतु त्याला चालणे सहन न झाल्याने तो एकदम खाली पडतो. तात्या त्याच्याकडे जातात. ते त्याचे डोके मांडीवर घेतात. सोबतच्या दोघांना पाणी आणण्यासाठी पाठवितात. त्या वृध्दाच्या तोंडावर तात्या पाणी शिंपडतात त्यामुळे तो वृध्द शुध्दीवर येतो. वृध्दाबरोबर असलेले इतर वारकरी कधीच पुढे निघून गेले होते. तात्यांनी वृध्द वारकऱ्यासाठी एवढे काही केले की, त्यामुळे त्याचे डोळे कृतज्ञतेने भरून येतात. तो तात्यांना म्हणतो,

'बाबा रे ! मी आळंदीला गेलो. ज्ञानेश्वराचं दर्शन घेतलं. पण मला ज्ञानेश्वर भेटला नाही. तूच मला खरा ज्ञानेश्वर भेटलास.''[२५]

### ३.२.२३ स्वामी दयानंदांच्य मिरवणुकीस झालेला विरोध :

स्वामी दयानंद ह्यांची मिरवणूक काढायची होती. विरोधकांनी मात्र त्यास विरोध करायवयाचा ठरविले होते. स्वामी दयानंदांसारखीच प्रतिकृती तयार करून तिची गाढवावरून मिरवणूक काढायची, असे त्या लोकांनी ठरविले होते स्वामी दयानंद हे स्त्रीशिक्षण, विधवाविवाह अशा वर्णव्यवस्थेच्या विरोधातील गोष्टी शास्त्रसंमत आहेत, असे सांगत होते. त्यामुळे त्यांचा निषेध करण्याच्या उद्देशाने विरोधकांनी तो बेत आखला होता. परंतु तात्यांना तो अगोदरच माहीत असल्यामुळे पंधरा-वीस तालीमबाज पोरांना आपल्या बरोबर घेऊन ते आलेले होते. हत्तीवरून काढलेली स्वामी दयानंदांची मिरवणूक जवळ-जवळ सफल झालेली पाहून विरोधक चिडले होते, शिवीगाळह करू लागले होते. तरीही लोकांनी त्यांच्याकडे दुर्लक्ष केले. परंतु जेव्हा दगडफेक सुरू झाली, तेव्हा मात्र पोलीस अधिकारी चिडला. पण त्याला रावसाहेबांच्या (रावसाहेब रानडे) आज्ञेशिवाय काहीच करता येत नव्हते. पण फक्त हल्ल्याचा आभासच कारणीभूत ठरला व त्यामुळे मग त्या लोकांना पळता भुई थोडी झाली. निरोपाचे भाषण चालू असताना विरोधक गर्दभराजाचा जयजयकार करीत होते. त्यामुळे संतापलेल्या लोकांनी समोर येईल त्याला चोप दिला. गावढवाबरोबर त्याच्या शिष्यमंडळींचीही फटफजिती झाली. गाढवापेक्षाही मग जास्त वेगाने ते आपआपल्या गल्लीबोळात आपली शेंडी उडवीत पाय लावून पळून गेले. तात्यांना वाईट वाटत होते ते एकाच गोष्टीचे. ती म्हणजे विरोधकांच्या कृष्णकृत्यात त्यांना माळ्याकुणब्यांच्या मुलांनीही मदत केली होती.

### ३.२.२४ दुष्काळाचे सावट :

१८७७ साली भारतात भयंकर दुष्काळ पडला होता. ह्या दुष्काळामुळे लोकांच्या घरातील सर्वच अन्न संपले होते. दुष्काळास त्रासून गेलेल्या शेतकऱ्यांवर सावकारांनी

जास्तच कर्जाचे ओझे टाकले होते. कर्जाची परतफेड न केल्यास त्यांच्यावर फिर्याद ठोकण्यास सुरूवात झाली होती. शेतकरी पोलीस कोठडीत जाऊन पडले होते. शेतीभाती, गुरेढोरे, एवढेच काय, बायकापोरेसुध्दा सावकारांकडे गहाण टाकली होती. भीतीपोटी शेतकऱ्याने कायद्याचे दार कधी ठोठावले नाही. तात्यांनी ह्या लोकांसाठी अन्नछत्र उघडले होते. तात्यांची पुतणी ठकूबाई हीदेखील काकूस मदत करण्यासाठी येत होती. दुष्काळपीडित शेतकऱ्यांना सकाळ-संध्याकाळ दोन हजार भाकरी वाटल्या जात होत्या. दुष्काळी कामे निघत होती. गुराढोरांचे हाल तर पाहावतच नव्हते. तात्या 'दीनबंधू'तूनही लिखाण करत होते. त्यातून त्यांनी दुष्काळी परिस्थितीवर उपाययोजना सुचविणारे विचार व्यक्त केले. अशातच प्लेगची साथ आली. त्यातच लक्ष्मी, बाबू, शिवाजी ही अनाथ आश्रमातील मुले गेली. तात्यांचे थोरले बंधू राजारामभाऊ दुष्काळी परिस्थितीत कामासाठी मुंबईला गेले होते. मुंबईची हवा त्यांना मानवली नाही व त्यातच त्यांचे निधन झाले.

### ३.२.२५ शेतकरी चळवळ :

जोतिरावतात्यांचा मूळचा पिंड शेतकऱ्याचा. भारत हा शेतीप्रधान देश आहे. देशाच्या आर्थिक व सामाजिक स्थितीचा शेतकरी हाच केंद्रबिंदू आहे. परंतु हाच शेतकरी आज मात्र उपेक्षित जीवन जगत आहे. त्याला त्याच्या दैनंदिन गरजासुध्दा भागविता येत नाहीत. त्याचा कोणीच विचार करीत नव्हते. कर्जाने गांजलेल्या शेतकऱ्यांवर कर्जवसुलीसाठी सावकार फिर्यादी दाखल करीत होते. मुदतीच्या आत कर्ज दिले नाही, तर त्यांना पोलीस कोठडीत टाकले जात असे. स्वत:च्याच नावावरचे नव्हे, तर आपल्या पिढीजात असलेल्या कर्जाचे ओझेही शेतकऱ्यांच्या डोक्यावर असे. त्यासाठी स्वत:ची बायकोपेरेसुध्दा त्यांनी सावकारांकडे गहाण टाकली होती. स्वत: उपाशी राहून सावकाराचे कर्ज फेडण्यासाठी आपल्या शेतातील सर्व पीक त्यांनी सावकारांच्या घरात नेऊन टाकले होते. शेतकऱ्याचे सारे आयुष्य शेवटपर्यंत कर्जाने वाकून गेलेले होते. तरीही सावकाराचेच

पाय त्यांना धरावे लागत होते. करडे गावातील बाबासाहेब देशमुख ह्या शेतकऱ्यावर सावकारांनी जेव्हा जप्ती आणली, तेव्हा त्याला हा अन्याय सहन झाला नाही. त्याने लगेच सर्व शेतकऱ्यांना एकत्र आणले. सर्वच शेतकरी कर्जाने गांजलेले होते. त्यांनी सावकारांवर बहिष्कार टाकला. सावकारांना घराबाहेर पडणेही अशक्य होऊन गेले. शेवटी त्यांनी पोलिसांची मदत घेतली. त्यामुळे हे प्रकरण जास्तच बिघडले व पूर्ण वणवा पेटला. पिढ्यान्‌पिढ्याचा संताप शेतकरी व्यक्त करीत होते. सरकारी अधिकाऱ्यांनी शेतकऱ्यांच्या तक्रारी ऐकून घेण्याचे आणि नुकसानभरपाई देण्याचे आश्वासन दिल्यानंतर शेतकऱ्यांचा राग थंड झाला.

### ३.२.२६ 'दीनबंधू' वर्तमानपत्र :

शेतकऱ्यांच्या कल्याणासाठी तात्यांबरोबर त्यांचे मित्र कृष्णराव भालेकर ह्यांनी 'दीनबंधू' नावाचे वर्तमानपत्र काढावयाचे ठरविले. त्याद्वारे त्यांना सत्यशोधक समाजाचा प्रचारही करावयाचा होता. सरकारचे शेतकऱ्यांच्या खऱ्या परिस्थितीकडे लक्ष वेधण्यासाठी हे पत्र सुरू करावे, अशी कृष्णराव भालेकर ह्यांची तळमळ होती व त्यासाठी कृष्णराव भालेकर ह्यांनी स्वतःच्या खर्चाने छापखाना काढला. १८७७ सालच्या जानेवारी महिन्याच्या पहिल्या तारखेस 'दीनबंधू' ह्या साप्ताहिकाचा पहिला अंक पुण्यास प्रकाशित केला. त्यामुळे कर्मठ सनातनी वर्गातील लोकांची झोप उडाली. परंपरागतपणे चालत आलेले आपले वर्चस्व कायम राहील की नाही, ह्याची त्यांना काळजी वाटत होती. त्यामुळेच हे पत्र चालेल की नाही, ह्याबद्दल थोडीशी शंकाच त्यांच्या मनात होती.

### ३.२.२७ ताराबाई शिंदे ह्यांचे परखड विचार :

बापूजी हरी ह्यांच्याबरोबर आलेली त्यांची मुलगी म्हणजेच ताराबाई शिंदे ह्या होत. पुरुषप्रधान हिंदू समाजात होत असलेल्या अन्याय-अत्याचाराला त्यांनी वाचा फोडली होती. त्यांना जो वास्तव जीवनात अनुभव आला होता, त्याचाच काहीसा परिणाम त्यांच्या

जीवनावर झाला असावा. बापूजी हरी ह्यांनी आपल्या मुलीला घरीच शिकविले होते. त्यामुळेच त्या स्त्रियांवर होणाऱ्या अन्यायाविरूध्द पेटून उठल्या व त्यांनी पुढे 'स्त्रीपुरुष तुलना' ह्या निबंधाचे लेखन केले. म.फुले ह्यांच्या विचारांचा आणि अन्वेषणपध्दतीचा त्यांच्यावर परिणाम झाला होता. त्यामुळे त्या तात्यांना भेटायला आल्या होत्या. काकूंनाही भेटायची त्यांची इच्छा होतीच.

''पतिनिधनाबरोबर स्त्रीला केशवपन करायला लावून तिला घरकोंबडी बनवता. मग त्याच न्यायाने पत्नी मेल्यावर आपल्या दाढीमिश्या भादरून तुम्ही अरण्यात का राहत नाही ? पुरुषांनी अनेक बायका करणे शास्त्राला चालते. मग स्त्रियांना नादी लावणारे पुरुषच असतात. अमुक बाईने गोसाव्याच्या वेशाने पुरुष पळवून नेला, असे कधी आढळते का ? वेश्या ह्यासुध्दा पुरुषांनी फशी पाडलेल्याच स्त्रिया नसतात का ?''[२६] ताराबाईच्या निबंधातील हा उतारा पाहिला, तरी हे लक्षात येते की, संपूर्ण स्त्रीजातीचेच दु:ख त्यांनी आपल्या मार्मिक व हृदयद्रावक शब्दांमधून मांडले आहे. तात्यांनी स्त्रीचे असे प्रथमच लिखाण वाचले होते. त्यामुळे त्यांना ताराबाईविषयी अभिमान वाटला.

### ३.२.२८ नगरपिते म्हणून झालेली निवड :

एवढा सर्व कामाचा व्याप असूनही तात्यांनी पुणे नगरपालिकेचे नगरपिते ही पुन्हा नवीन जबाबदारी स्वीकारली होती. नगरपिते म्हणून कोणतेही काम निष्ठेनेच करण्याचे त्यांनी ठरविले होते. नवीन नोकरभरती, शहर स्वच्छता, अंदाजपत्रक, हिशोबतपासणी, दारुच्या दुकानावर बंदी, वेताळ पेठेतील भाजीमंडईसाठीच्या इमारत बांधकामाच्या प्रस्तावाला विरोध, शहराचे आरोग्य सुधारण्याचे प्रयत्न ह्या गोष्टी त्यांनी केल्या.

### ३.२.२९ कोल्हापूरचा खटला :

कोल्हापूर संस्थानातील चौथ्या शिवाजीमहाराजांचे प्रकरण संपूर्ण महाराष्ट्रभर गाजत होते. कोल्हापूर संस्थानाचे दिवाण माधवराव बर्वे ह्यांनी मन मानेल तसा कारभार चालू केला

होता. शिवाजीराजे मोठे झाले, तेव्हा बर्वे ह्यांच्या कारभारतील ते अडथळा बनू लागले. त्यामुळे वासुदेव बर्वे ह्यांनी त्यांना वेडे ठरविले, अहमदनगरच्या किल्ल्यात कोंडून ठेवले व त्यांचा छळ चालू केला. त्यामुळे संपूर्ण महाराष्ट्रात संतापाची लाट उसळली. 'केसरीने इंग्रज सरकारवर ताशेरे ओढले त्यामुळे टिळक व आगरकर ह्यांच्यावर खटला भरुन त्यांना चार महिन्यांची कैद झाली. परंतु शिवाजीराजांचा छळ पुढेही चालूच राहिला व त्यातच त्यांचा अंत झाला. त्यामुळे महाराष्ट्रभर असंतोष माजला.

**३.२.३० विधवांच्या केशवपनाच्या चालीस विरोध :**

फुले ह्यांच्या काळात सनातनी ब्राह्मण आपल्या स्वत:च्याच मुलीचे तिच्या पतीच्या निधनानंतर केशवपन करीत. फुले ह्यांनी सर्व न्हाव्यांची सभा घेतली व पुरुषांनी स्त्रियांवर हा अन्याय करायचा नाही, असे सांगितले. पण ह्यावरही ब्राह्मणांनी विधवांचे केशवपन घरातील स्त्रियांनी किंवा न्हाविणीकडून करावे, असा तोडगा काढला. ज्या विधवा स्त्रियांचे केशवपन झालेले नसे, त्यांच्या मरणानंतर त्यांचे अंत्यसंस्कारदेखील करण्यास कोणी तयार होत नसे. ही दुष्ट रुढी बंद करण्यासाठी 'दीनबंधू' मध्ये म.फुल्यांनी लिहिले होते. विधवांचे केशवपन करण्याचा अत्याचार करू नये, असे फुले ह्यांनी न्हाव्यांना आवाहन केले होते. परंतु त्याला म्हणावा असा प्रतिसाद मिळाला नाही.

**३.२.३१ देवदासी प्रथेस विरोध :**

अजाणत्या वयातच देवदासीचे दगडाबरोबर त्याला देव मानून लग्न लावले जाते. यल्लमादेवीच्या नावाने देवदासी सोडण्याची प्रथा मोठ्या प्रमाणात मागासलेल्या जातीतच दिसते. ह्या अंधश्रध्देस बळी पडलेल्या मुलींना प्रथम देवीच्या नावाने जरी सोडले, तरी नंतर मात्र त्यांना आयुष्यभर वेश्या म्हणूनच जगावे लागते. देवदासी मुलीचे लग्न खंजिराबरोबर लावले जात होते. प्रथम तिला ब्राह्मणाच्या स्वाधीन केले जात होते व नंतर समोर येणाऱ्या कोणत्याही पुरुषाला तिने आयुष्यभर आपला देव मानून त्याची सेवा करीत राहावे लागत

असे. श्रीमंत असणाऱ्या लोकांना ती विकलीच जात होती. त्यांच्याकडून आपल्या डोळ्यासमोर घडणारा वेश्या बनवण्याचा धंदाच होता. तात्या मुंबईला गेल्यानंतर एका लहान मुलीचा विवाहविधी एके ठिकाणी चालू होता, हे त्यांना दिसले. तिचा विवाह कोण्या मुलाशी नव्हे, तर दगडाशी लावण्यात येणार होता. आनंदरावांनी (सत्यशोधक समाजाचे एक कार्यकर्ते) तात्यांना आधीच सांगितले होते की, आपण समाजासाठी एवढे काही केले. आता ह्या मुलीच्या आयुष्याचाही आपणच काहीतरी चांगला मार्ग काढा. आनंदरावांची तळमळ तात्यांच्या हृदयात घर करून बसली होती.

तात्यांनी निर्णय घेतला की, काहीही झाले, तरी चालेल. पण हे लग्न थांबविले पाहिजे. लग्न थांबविण्यासाठी त्या लोकांची खूप समजूत तात्यांनी काढली. परंतु काहीही उपयोग झाला नाही. तात्यांनी शेवटी पोलीस सुपरिंटेंडेंटची मदत घेतली. प्रथम त्या पोलीस अधिकाऱ्याने नकार दिला. कारण कोणत्याही धार्मिक कार्यास विरोध त्याकाळी इंग्रज अधिकारी करीत नव्हते. पण तात्यांनी सांगितले की, हे लग्न म्हणजे धार्मिक कार्य नाही, तर अमानुष कृत्य आहे. परंतु सुपरिंटेंडेंट तयार होईना. तात्यांनी सांगितले की, आम्हाला कमिशनरसाहेबांकडे घेऊन चला. मग सर्वजण कमिशनरसाहेबांच्या घरी गेले. तात्यांचे सर्व म्हणणे ऐकून मग कमिशनरसाहेबांनी ते लग्न थांबविण्याचा हुकूम दिला. तात्यांना समाधान झाले. परंतु ते कायमचे समाधान नव्हते. कारण तेच लग्न त्या लोकांनी पुढे पार पाडलेच.

### <u>३.२.३२ बडोदा येथे सन्मान</u> :

राचचंद्रराव धामणस्कर (सत्यशोधक समाजातील कार्यकर्ते) हे तात्यांना सारखे बडोद्यास यावे, असा आग्रह करीत होते. ‘असूड’ ऐकण्याची त्यांची संधी चुकली होती. तेव्हा तात्या पुन्हा त्यांना वाचून दाखविणार होते. पण रामचंद्रराव म्हणतात, “तुम्ही ‘असूड’ वाचून दाखविण्यासाठी आता बडोद्याला यावे. बडोद्याला महाराजांची भेट घेऊन शेतकऱ्यांची दुरवस्था त्यांना जाणून दिली पाहिजे.” तात्यांना मात्र महाराज आपले म्हणणे

ऐकून घेतील की नाही, ह्याची शंकाच होती. परंतु महाराजांनी त्यांचे स्वागत तर केलेच, पण तात्यांच्या तोंडून 'असूड' ही ऐकला. तात्यांचा मुक्काम संपल्यानंतर महाराजांनी त्यांचा सन्मान केला व शुभेच्छा देऊन त्यांना निरोप दिला.

**३.२.३३ सदाशिवराव गोवंडे ह्यांचा मृत्यू :**

सदाशिवराव गोवंडे हे तात्यांचे मित्र होते. शाळा काढण्यात मदत करणारे, स्वत:चा वाडा शाळेला खुला करून देणारे, मुलांना पाट्यापुस्तक देणारे सदाशिवराव प्रत्येक वेळी मदत करीत होते. काही कारणांमुळे दोघांच्या कार्याचे स्वरूप बदलले होते. परंतु काही दिवसांपासून ते विचित्रच वागत होते. सतत वडिलांच्या समधीजवळ बसलेले असत. दिवसभर ध्यान, जप, तप, गुरूकृपा संपादन करणे, एवढेच त्यांना वेड होते. गुरूंची भेट होईल म्हणून ते येरवड्याच्या तुरुंगातही गेले. काळबुवा ह्या व्यक्तीला घेऊन ते आले. स्वत: सदाशिवराव काळबुवाची सेवा करीत. परंतु पंढरपूरला गेल्यानंतर काळबुवा ह्यांच्या विचित्र वागण्याने त्यांना वेगळाच अनुभव आला. त्यांचे मतपरिवर्तन झाले. त्याचाच परिणाम होऊन सदाशिवराव आजारी पडले. त्यात केरोनाना छत्रे ह्यांच्या निधनाने ते जास्तच धास्तावले. त्यामुळे त्यांच्या मनावर ताण पडला. शेवटच्या निरोपाच्या वेळी त्यांनी हसून तात्यांच्या हातात हात दिला. त्यांना तात्यांना काहीतरी सांगायचे होते. परंतु त्यांनी एकदा डोळे मिटले ते कायमचेच. सदाशिवरावांच्या मृत्यूने तात्या खूप हळहळले.

अशा प्रकारे एकूण दुसऱ्या भागात तात्यांच्या विचारांचे कृतीत झालेले परिवर्तन, स्त्रियांसाठी त्यांनी केलेले महान कार्य, अनाथ मुलांची केलेली सेवा, स्वत:पेक्षा समाजाचाच केलेला विचार, अतिशूद्रांसाठी केलेले कष्ट, शिवाजीमहाराजांचे चरित्र वाचून झालेली एक नवीनच जाणीव, शिवाजीमहाराजांच्या समाधीचा लावलेला शोध, त्यांच्या कार्याने प्रेरित होऊन रचलेला पोवाडा, भारतीय सामाजिक स्थिती पाहून एकून परिस्थितीविषयी 'गुलामगिरी' तून प्रकट झालेले त्यांचे मत, ब्राह्मणांच्या कूट कारस्थानांचे 'ब्राह्मणाचे

कसब'-द्वारा घडवलेले दर्शन, समाजासाठीच निर्माण केलेला 'सत्यशोधक समाज', त्यांच्या आयुष्यात झालेले यशवंताचे आगमन, दुष्काळात नगरपिते म्हणून केलेले कार्य, मित्र सदाशिवराव गोवंडे व चिमणाआई ह्यांचा झालेला मृत्यू, तरीही दु:ख करीत न बसता आपले कार्य सतत चालू ठेवणारे तात्या हे सर्व आपण ह्या कथानकामधून जाणून घेतले.

**३.२.३४ तिसऱ्या भागातील कथानकाची सुरूवात :**

राष्ट्रीय सभेने वाहणाऱ्या वाऱ्याच्या वातावरणानेच तिसऱ्या भागाला आरंभ होतो. सीतारामपंत चिपळूणकरांच्या नेतृत्वाखाली सर्वजण कामाला लागले होते. राष्ट्रीय सभा भरविण्यामागचा हेतू हा होता की, इंग्रज सत्तेविरूध्द लढाई चालू असतानाच आपल्यातीलच लोकांना अधिकाराच्या जागा पाहिजे होत्या. परंतु ज्या शेतकरीवर्गाच्या कष्टावर भारत देश उभा आहे, त्याचाच विचार मात्र कोणीही केलेला नव्हता. आपल्या स्वत:पुरताच ते विचार करीत होते. एकूण समाज आणि त्याच्या स्थितीविषयी कोणीही विचार केलेला नव्हता. तात्या मात्र त्याचाच विचार करीत होते. त्यांनी ते विचार लिहून काढले. त्यात त्यांनी सरकारला आणि नेत्यांना इशार दिले होते. आपल्या स्वत:च्या ढासळत्या प्रकृतीकडेही त्यांनी लक्ष दिले नव्हते. तशा अवस्थेत ते लिहीतच होते. स्वत:च्याच पोळीवर दाळ ओढणाऱ्या ह्या समाजकार्याचा त्यांना राग येत होता.

**३.२.३५ सत्यशोधक समाजाची लग्नपध्दती :**

तात्या सत्यशोधक समाजाच्या कार्यासाठी सतत बाहेरगावी जात. त्यामुळे त्यांच्या लक्षात अनेक अडचणी आल्या होत्या. त्यात महत्त्वाची अडचण म्हणजे सत्यशोधक समाजात लग्न हे ब्राह्मणाशिवाय लावले जात असे. त्यामुळे मंगलाष्टका म्हणावयास कोणी नसे. तेव्हा त्यासाठी तात्यांनी स्वत: मंगलाष्टका रचल्या व त्या नवऱ्या मुलामुलीने स्वत: म्हणावयाच्या, अशी पध्दत सुरू केली. ती मंगलाष्टका म्हणजे एकमेकांशी दिलेले एक वचनच असे. त्याचबरोबर पाहुण्यामंडळींनीही त्यांना आशीर्वादपरही मंगलाष्टका

म्हणावयाच्या त्यातून ते आशीर्वाद देखील देत असत. वधुवरांनीदेखील कुळस्वामीचे व उत्पन्नकर्त्यांचे चिंतन करायचे, अशी पध्दत तात्यांनी चालू केली.

### ३.२.३६ ग्रंथकार सभा :

शहरातील राष्ट्रीय सभेचे वारे संपताच लगेच न्या. रानडे व 'लोकहितवादी' गोपाळ हरी देखमुख ह्यांनी 'ग्रंथकारांच्या मार्गातील अडचणी दूर व्हाव्या' म्हणून 'मराठी ग्रंथोत्तेजक मंडळी' ची स्थापना केली होती. ह्या मंडळाने दुसरी सभा आयोजित केली. परंतु ह्या नेत्यांनी सामान्य माणसाच्या समस्यांशी काहीही देणेघेणे नसल्याप्रमाणे तात्यांच्या 'गुलामगिरी' ह्या ग्रंथाचा उल्लेखही केलेला नव्हता. तात्यांना मात्र ह्या संमेलनात सहभागी होण्यासाठी निमंत्रण पाठविले होते. तात्यांचा मात्र राग होता तो ह्या समाजाचे खरे दु:ख ज्यांनी जवळून पाहिले नव्हते. जाणून घेतले नव्हते, अशा लोकांवर.समाजात होत असलेल्या शेतकऱ्यांवरच्या अन्यायाची त्यांना जणू जाणीवच नव्हती. फक्त सुधारणा करण्यावरच टवाळी करणारे अशांचेच ते कौतुक करीत होते. आपल्या समाजातील स्त्रीशूद्रांच्या दु:खांना ज्या ग्रंथाने वाचा फोडली, त्या 'गुलामगिरी' ह्या ग्रंथाचे मात्र त्यांना काहीच महत्त्व वाटत नाही, ह्याचेच तात्यांना फार दु:ख झाले होते. म्हणून तात्यांनी निमंत्रणास उत्तर म्हणून एक पत्र पाठविले होते.

### ३.२.३७ 'सत्सार' वर्तमानपत्र व 'इशारा' :

'सत्सार' च्या पहिल्या अंकात म.फुले ह्यांनी पं. रमाबाई ह्यांच्यावर झालेल्या टीकेला उत्तर दिले आहे. रमाबाईंनी २९ सप्टेंबर १८८३ रोजी लंडन येथे हिंदू धर्माचा त्याग करून ख्रिस्तीधर्माची दीक्षा घेतली होती. त्या अमेरिकेला राहून आल्या होत्या. त्यामुळे त्या बाटल्या, असाच त्यांच्यावर आरोप केला जात होता.

'उदरी नऊ महिने ओझे वागविणाऱ्या स्त्रीजातीवर गुरगुरणारा उपटसूळ' ह्या शीर्षकाखाली दुसऱ्या अंकात पंडिता रमाबाई, ताराबाई शिंदे ह्या स्त्रियांवर टीका करणाऱ्या

एकूण पत्रकारवर्गाचा तात्यांनी समाचार घेतला आहे. ह्यातून त्यांचे सहकारी नारायण लोखंडे, कृष्णाजी भालेकर हेही सुटलेले नाहीत. शूद्रांतिशूद्रांना आर्यभटाचे ब्रह्मघोळ स्पष्ट दिसून यावेत, ह्यासाठी तात्यांनी 'इशारा' नावाची पुस्तिका लिहिली. त्याचबरोबर त्यांनी आपल्याच लोकांचे राज्य असताना आपल्याच शेतकरी बांधवांच्या झालेल्या हालाचे आणि ह्याच देशात परकीयांचे राज्य आल्यावर मात्र झालेल्या सुखसोयींचे वर्णन 'इशारा' मध्ये केले आहे.

### ३.२.३८ स्वत:चे मृत्युपत्र : यशवंताचे लग्न :

तात्यांच्या वयाने आता साठी ओलांडली होती. सतत काम करण्याची तळमळ बाळगणाऱ्या व स्वत:चे सारे आयुष्य दगदगीत घालविणाऱ्या तात्यांनी स्वत:च्या प्रकृतीकडे पूर्ण दुर्लक्ष केले होते. पूर्वीसारखे शरीर त्यांना साथ देत नव्हते. त्यात तात्यांना अर्धांगवायूचा पहिला झटका आला. कधीही कोणाजवळ स्वत:च्या प्रकृतीविषयी ते बोलत नव्हते. तो त्यांचा स्वभावच नव्हता. समाजाच्या कल्याणासाठी ते आपले सारे दु:ख, यातना सहन करीत आतल्या आत कोंडून टाकीत. अर्धांगवायूच्या पहिल्या झटक्यामुळे तात्यांना काकूंविषयी काळजी वाटू लागली. जिने आयुष्यात सतत सावलीप्रमाणे आपल्याला साथ दिली, तिच्यासाठी व स्वत:चे मूल झाले नाही म्हणून दत्तक घेतलेल्या व शिकत असलेल्या मुलाच्या आयुष्याची तरतूद लावण्यासाठी तात्यांनी स्वत:चे मृत्युपत्र लिहिण्यास घेतले. मृत्युपत्राची सुरूवात 'सत्यमेव जयते' ह्या घोषवाक्याने त्यांनी केली. त्यांनी यशवंताला आपल्या स्थावर व जंगम मिळकतीचा मालक केले. इतर कोणाचा अधिकार नाही, असे सांगितले. तसेच यशवंत जर उनाड व वाईट वर्तणूक करू लागला, तर त्यास त्याच्या वाटणीची इतर मालमत्ता देऊन बाकीची सर्व शूद्रांच्या हुशार, गरीब मुलास द्यावी. तसेच स्वत:चा अंत्यविधी फक्त यशवंत किंवा तो हजर नसल्यास सत्यशोधक

समाजातील लोकांनीच करावा व वडिलोपार्जित रीतिरिवाजाप्रमाणेच शक्तीनुसार मिठात घालूनच पुरावे, हेही त्यांनी लिहिले. काकूंची त्यांना पूर्ण सोय करून ठेवली होती.

त्यांना त्यावेळेस यशवंताच्या लग्नाचीही काळजी होती. उभे आयुष्य समाजहितासाठी घालविणाऱ्या महापुरुषाने जेव्हा शरीर साथ देईनासे झाले, तेव्हा यशवंताच्या लग्नाची गोष्ट आपल्या पत्नीजवळ काढली. काकूंनाही त्याचीच काळजी लागली होती. कारण यशवंत हा दत्तक घेतलेला आणि ज्याच्या जन्माची कथा वेगळीच होती, तेव्हा काकूंनाही त्याचे लग्न लवकरात लवकर व्हावे असेच वाटत होते. जोतिरावांनी यशवंताला मुलगी देण्याबद्दल ससाण्यांकडे मागणी घातली. त्यांनीही आढेवेढे न घेता लगेच ह्या मागणीस मान्यता दिली. दोघांनाही खूप आनंद झाला. परंतु मुलीने चौथी शिक्षण पूर्ण केल्यानंतर लग्न करावे, अशी इच्छा त्यांनी व्यक्त केली, तेव्हा तात्यांनाही खूप आनंद झाला. तिला हडपसर येथे शाळेसाठी आणले. त्यांच्या घरची लक्ष्मी त्यामुळे काकूंनी तिचे नाव राधाबाईंचे लक्ष्मी केले. ती माहेरच्या माणसांमध्ये रमावी, तशी तात्या व काकू ह्यांच्यामध्ये रमली.

### ३.२.३९ तात्यांचे 'अखंड' :

जादूटोणा करून गरीब भोळ्या जनतेला लुबाडणाऱ्या एका माळी जातीतीलच विठोबा भुजबळ नावाच्या 'कुऱ्हाडीच्या दांड्या'वर रचलेला अखंड प्रथम आहे. सत्यशोधक समाजाच्या लोकांनी ब्राह्मणाशिवाय लावलेल्या लग्नास विरोध करून ह्या भुजबळाने ब्राह्मणाचे पैसे घेऊन न्हाव्याच्या लग्नाची तयारी केली. परंतु ह्या मंडळींनी आपल्या मुलामुलींची लग्ने ब्राह्मण मंडळीस न बोलावता लावण्याचे ठरविले होते. तात्यांना ह्या व्यक्तीचा खूप राग आला व ह्या संतापातच त्यांनी लिहिण्यास घेतले. अखंडाचे एकूण सहा विभाग आहेत.

''मानवता धर्म एक

सर्वांचा निर्मिक आहे एक धनी । त्याचे भय मनी । धरा सर्व ॥१॥''

ह्या अखंडाने त्यांनी सुरूवात केली. 'कुळंबिण' ह्या अखंडाने त्यांनी शेवट केलेला आहे.

**३.२.४० शेतकऱ्याचा पेहराव :**

चिपळूणकरांच्या वाड्यात इंग्लंडचे राजपुत्र 'ड्युक ऑफ् कॅनॉट' ह्यांच्या सन्मानाप्रित्यर्थ मेजवानी ठेवण्यात आली होती. सर्वच मान्यवर व्यक्तींना निमंत्रण पत्रिका पाठविण्यात आल्या होत्या. मेणे, पालख्या घेऊन माणसे कार्यक्रमास उपस्थित होती. तात्यांनाही निमंत्रण पत्रिका पाठविण्यात आली होती. त्या कार्यक्रमास तात्या उपस्थित होते. परंतु तात्यांनी असा काही वेश परिधान केला होता की, तात्या ओळखीचेच वाटत नव्हते. त्यांनी भारतीय शेतकऱ्याची वास्तव स्थिती राजपुत्र ड्युक ह्यांना दाखविण्यासाठी हातात काठी, डोक्यावर फाटके मुंडासे आणि खांद्यावर घोंगडे घेतले होते. त्यांनी मुंडीछाट कुडत्याखाली गुडघ्यापर्यंत धोतर नेसले होते. पायात फाटक्या चपल्या व त्याही दोरीने बांधलेल्या, डोक्यावरचे मुंडासे गाठीगाठीने बांधलेले असे होते. त्यांच्या ह्या वेशामुळे सर्वजणच गोंधळात पडले. हरी चिपळूणकरांनी मात्र त्यांना ओळखले व राजपुत्राच्या शेजारीच त्यांनी तात्यांना खुर्ची दिली. तात्या बोलण्यास उभे राहिले ते म्हणाले, ''आपल्या देशात नव्वद-पंच्याण्णव टक्के माणसं ज्या पेहरावात आजही जगतात, तोच हा पेहराव आहे. मी स्वत: एक शेतकरीच आहे. या शेतकऱ्याच्या रात्रंदिवस कष्ट करणाऱ्या लोकांना खायला पोटभर अन्न आणि लज्जारक्षण करण्यापुरता कपडादेखील मिळत नाही, हेच मला तुम्हाला दाखवून द्यायचे आहे. हिंदुस्थानच्या महाराणीला खरी परिस्थिती कळू द्या.'' तात्यांच्या ह्या रोखठोक बोलण्याने राजपुत्र ड्युकही आश्चर्यचकित झाले. जनतेच्या कल्याणासाठी एवढ्या तळमळीने झटणारी व्यक्ती ते प्रथमच पाहात होते. अशी ती अविस्मरणीय मेजवानी व त्यातले तात्यांचे भाषण हा विषय पुढे पुण्यात बरेच दिवस चर्चेत होता.

### ३.२.४१ 'शेतकऱ्याचा असूड' :

शेतकऱ्याला दीनवाण्या अवस्थेत आणून ठेवणाऱ्या जुलमी धर्माचे, ब्राह्मण कामगारांचे सत्य स्वरूप सांगण्यासाठी व त्यांच्या अत्याचारापासून बचाव करण्यासाठी म.फुल्यांनी 'शेतकऱ्याचा असूड' हा ग्रंथ लिहिला. इतर देशांमधील शेतकऱ्याशी आपल्या भारतातील शेतकऱ्याची तुलना केली, तर आपल्या भारतातील शेतकरी कसा अज्ञानी व देवभोळ्या वातावरणात वावरत आहे आणि त्यामुळेच तो आजही कसा मागेच राहिला आहे, हे लक्षात येते. 'ब्राह्मणो मन दैवत ' हे वेड अजूनही त्याच्या डोक्यातून निघालेले नाही, हे एक त्याचे कारण आहे त्याला विद्येपासून ब्राह्मण लोकच दूर ठेवत आहेत. शेतकऱ्याचा कैवारी कोणीही नाही. उलट बिकट परिस्थितीत त्याच्यावर जास्तच अन्याय करणारे हे लोक स्वतःचाच स्वार्थ साधून घेत आहेत. तात्यांनी ह्या सर्व बाबींचे वर्णन 'शेतकऱ्याचा असूड' मध्ये केलेले आहे. ह्याची एकूण पाच प्रकरणे आहेत. मुलाच्या जन्माच्या अगोदरपासून ते मृत्यूपर्यंत व प्रत्येक सणाच्या दिवशी हे भट कसे पंचांग घेऊन घरी जातात व शेवटी शिमग्याच्या दिवशी बोंबा मारतात, ह्याचे वर्णन म.फुले ह्यांनी केले आहे. सरकार शेतकऱ्याकडून पैसे वसूल करते परंतु त्याचा उपयोग शेतकऱ्याच्या मुलांकरिता होत नाही. कारण शेतकऱ्याची मुले शिक्षणच घेत नाहीत. त्याला कारणही त्याकाळचे शिक्षकच होते. शेतकरी प्रथमपासूनच दैन्यावस्थेतच जगत आला आहे. त्याकाळच्या ह्या सर्व सामाजिक परिस्थितीचे वास्तव चित्रण 'शेतकऱ्याचा असूड' मधून आले आहे. हा ग्रंथ श्रीमंत गायकवाडमहाराजांना आवडला होता. त्यांनी त्याच्या ग्रंथप्रकाशनासाठी पैसेही दिले होते.

### ३.२.४२ 'महात्मा' पदवीने गौरव :

जोतिरावांच्या साठ वर्षांच्या देहाने समाजाच्या कल्याणासाठी चंदनाप्रमाणे सतत झिजण्याचे व्रत आंगिकारले होते. हालअपेष्ठा, छळ सोसूनही म.फुले ह्यांचा गौरव झाला

नव्हता. सत्यशोधक समाजातील लोकांना ह्याची जाणीव होती. म्हणूनच तात्यांचा मोठा गौरव करावा, हा महत्त्वाचा निर्णय त्यांनी घेतला. मांडवीच्या कोळीवाडा सभागृहात तात्यांचा गौरव समारंभ ठेवला होता. ११ मे १८८८ ह्या दिवशी आपल्या उध्दारकर्त्यांचे ऋण फेडण्याकरिता सर्वसामान्य लोकांनी प्रचंड गर्दी केली होती. तात्यांचेही हृदय भरून आले होते. दीन-दलित-दुबळ्या जनतेसाठी असामान्य असेच त्यांनी कार्य केले होते. त्याग, अखंड परिश्रम, अज्ञानाविरुध्द, सनातन्यांविरुध्द, सत्ताधाऱ्यांविरुध्द अखंड लढा देणाऱ्या तात्यांच्या कार्याचा गौरव करून, स्फूर्तिदायक भाषणे देऊन 'महात्मा' ही अर्थपूर्ण अशी पदवी प्रचंड टाळ्यांच्या गजरात त्यांना अर्पण करण्यात आली. सर्वसामान्यांनी केलेला हा तात्यांचा गौरव अलौकिक असाच होता. त्यांचे अमर्याद प्रेम, उत्कट भावना, कृतज्ञता पाहून जोतिरावांचे अंत:करण भरून आले. सत्काराला उत्तर देताना ते म्हणाले,

"बंधूंनो आणि भगिनींनो, मला हा सन्मान बहाल करून तुम्ही आपल्या मनाचा मोठेपणा दाखवला आहे. मी एकच विचार करतो आहे. एवढ्या मोठ्या सन्मानाचा अंगिकार करावा, असे कार्य माझ्या हातून खरोखरच घडले आहे का ? बंधूंनों, मी आजवर जे थोडंबहुत काम केलं, ते माझ्या सद्सद्विवेकबुद्धीला स्मरून आणि ईश्वरी प्रेरणेनंच केलं. माझ्या शूद्रातिशूद्र बांधवांसाठी जे कर्तव्य करायला पाहिजे होतं, ते मी केलं. त्यासाठी झगडलो, लढत राहिलो."[२७]

हृदयाचा ठाव घेणाऱ्या ह्या भाषणाने सारा समाज गहिवरून गेला होता.

### ३.२.४३ वसतिगृहाची स्थापना :

तात्यांच्या डोक्यात खूप दिवसांपासून एक विचार तरळत होता. तो हा की, गरीब मुलांसाठी वसतिगृहाची स्थापना करावी. अखेरीस तात्यांनी हा विचार तडीस नेला. आल्हाटांचे घर भाड्याने घेऊन त्यासाठी त्यांनी मळा विकून पैसा खर्च केला होता. खुद्द तात्या गरीब मुलांच्या शिक्षणासाठी जातीने लक्ष घालीत होते. दररोज सकाळी त्यांना

उठविणे, अभ्यास करण्यास बसविणे, स्वत: त्यांचा अभ्यास घेणे, मैदानी खेळ शिकविणे, हे ते जातीने स्वत: करीत. दररोज दोन्ही वेळेस वसतिगृहातील मुलांना सकस अन्न व रविवारी वेगळे जेवण दिले जात असे. रात्री नऊच्या पुढे विद्यार्थ्यांना वसतिगृहाबाहेर जाण्यास बंदी घालण्यात आली होती. त्यांचे मनोरंजन करण्यासाठी तात्या त्यांना मनोरंजनपर गोष्टीही सांगत. तसेच कविता पाठ करून घेत. वसतिगृहातला विद्यार्थी व यशवंत ह्यांच्यात कुठलाच भेद मानला जात नसे. कितीतरी वेळा वसतिगृह बंद पडण्याची वेळ आली. परंतु तात्यांनी स्वत: उपाशी राहून मुलांच्या पोटाला घास घातला. वसतिगृह बंद पडू दिले नाही.

### ३.२.४४ 'सार्वजनिक सत्यधर्म' ग्रंथ :

'सार्वजनिक सत्यधर्म' हा म.फुले ह्यांचा ग्रंथ त्यांच्या मृत्यूनंतर प्रकाशित झाला. तात्यांना अर्धांगवायूचा दुसरा झटका आला होता. त्यात अर्धे अंग अधू झाले असतानाही डाव्या हाताने त्यांनी हा ग्रंथ लिहून काढला होता. निर्मिकाने उत्पन्न केलेल्या प्राणिमात्रांपैकीच मानव हा सुध्दा एक प्राणी आहे व त्याने त्या निर्माणकर्त्याचे स्मरण मनी जागृत ठेवून कोणत्या प्रकारचे आचरण करावे, तसेच माणसाने माणसाशी निर्माणकर्त्याला आनंद होईल ह्याप्रमाणेच कसे वागावे, हे सांगण्यासाठी, तसेच एकूणच मानव जातीच्या हितासाठी त्यांनी हा ग्रंथ लिहिला होता. सत्यवर्तनाची आवश्यकता, विविध पूजा, विविध संस्कार, अनिष्ट प्रथा, देवतेस प्रसन्न करून घेण्याच्या विचित्र विविध पध्दती हयांविषयी ह्या ग्रंथात त्यांनी विवेचन केले आहे. तसेच ३३ कलमे दिलेली आहेत व ती सर्व सत्यावर आधारित आहेत.

थोडक्यात, ह्या तिसऱ्या भागामधून तात्यांनी अनेक समाजहितकारक अशी कार्ये केलेली आपणास दिसून येतात. सत्यशोधक समाजाच्या लग्नविधीसाठी स्वत: मंगलाष्टका तयार केल्या, 'संसार', 'इशारा' सारखी वर्तमानपत्रे काढली, स्वत:चे मृत्युपत्र तयार केले, यशवंताचे लग्न लावून दिले, 'अखंडां'ची रचना केली, स्वत: शेतकऱ्याचा वेश परिधान

करून शेतकऱ्यांची दु:खे राजपुत्राला महाराणीपर्यंत पोहोचविण्यास सांगितली, 'शेतकऱ्याचा असूड' हा ग्रंथ लिहिला, 'सार्वजनिक सत्यधर्म ' हा ग्रंथ लिहून समाजातील लोकांच्या विविध प्रश्नांना उत्तरे दिली. म्हणूनच तात्यांचा 'महात्मा' ही पदवी देऊन गौरवही करण्यात आला. उतार वयामध्येही अखंड परिश्रम करण्याची त्यांची धडपड दिसून येते.

**३.२.४५ चौथ्या भागातील कथानक : म.फुल्यांचा मृत्यु व त्यानंतर सावित्रीबाईंनी दाखविलेली धीटाई :**

तात्यांना अर्धांगवायूचा दुसरा झटका आल्यामुळे ते अंथरुणावरच पडून होते. त्यांना अनेक लोक भेटून जात. त्यांनीही आता कोणावर राग धरला नव्हता.

आयुष्यभर समाजसेवेकरिता आपले जीवन अहोरात्र राबवणाऱ्या तात्यांना आपला शेवट जणू दिसू लागला होता. सर्व काही त्यांच्या मनासारखे झाले होते. परंतु खंत होती ती एकाच गोष्टीची. ती म्हणजे 'सार्वजनिक सत्यधर्म' हे पुस्तक प्रकाशित होते की नाही ह्याची. त्यांनी सर्वांच्या भेटी घेतल्या होत्या. ते सर्वांना सोडून जाणार होते. ज्य पंचतत्त्वांपासून हे शरीर बनले, त्यात ते विलीन होणार होते. तात्यांनी सर्व मुलांना जवळ बोलावून घेतले. यशवंताला जवळ घेऊन 'आईला अंतर देऊ नकोस', म्हणून सांगितले. काकूंची तर सर्व शक्तीच नाहीशी झाली होती. तरीही त्या तात्यांना तसे जाणवून देत नव्हत्या. परंतु काकूंना हुंदका आवरला नाही. तात्यांनी सर्वांना प्रार्थना करण्यास सांगितले व तशाही अवस्थेत काकूंना 'रडू नकोस', म्हणून खुणेनेच सांगितले व 'ईश्वरा-ईश्वरा . . . ' म्हणत त्यांच्या तोंडून लहानसा उसासा बाहेर पडला. त्याच क्षणी तात्यांची प्राणज्योत पंचतत्त्वात विलीन झाली. समाजहितासाठी सतत स्वप्न पाहणारे व ते पूर्ण करण्यासाठी हाडाची काडे करणारे तात्या सर्वांना सोडून गेले.

तात्यांचे महानिर्वाण झाले. परंतु हे प्रकरण येथेच संपत नाही. तात्यांना त्रास देणारी जशी मंडळी होती, तशीच सावित्रीबाई ह्यांनादेखील त्रास देणारी मंडळी होती. तात्यांच्या

अंत्यविधीसाठी आलेल्या जातभाई लोकांनी वेगळाच प्रश्न उपस्थित केला. 'यशवंताला दत्तक घेतला आहे, तो आपल्या जातीबाहेरचा आहे. तेव्हा त्याला तिरडीला हात लावण्याचा काहीही अधिकार नाही. तो अधिकार आमचा आहे', अशी त्यांनी भूमिका घेतली. पण तात्यांनी आपल्या मृत्युपत्रात असे लिहिले होते की, आपल्या अंत्यविधीस ह्या लोकांचा हात लागू नये. त्यामुळे काकू संतापल्या. त्या सर्व गोंधळ पाहून स्वत: बाहेर आल्या व तशाही अवस्थेत त्या अशा काही बोलल्या की, सर्वांचीच दातखिळी बसली. त्या म्हणाल्या, "भाऊजी, टिटव धरायची काळजी तुम्हाला नको. टिटव मी धरणार आहे. खांदा फक्त सत्याशोधक बांधव देतील. तुमची कोणाचीही सावली शेटजींवर पडायला नको आहे. इतक्या दिवसानंतर आजच तुम्हाला शेटजीची आठवण का झाली, ते मला माहीत आहे. निदान त्यांनी केलेल्या उपकारांची तरी आठवण ठेवा"[२८]

## ३.३ समारोप :

आजवर मराठीत अनेक चरित्रात्मक कादंबऱ्या लिहिल्या गेल्या आहेत. म.फुले ह्याच्या जीवनचरित्रावरही मराठीत तेरा कादंबऱ्या आहेत. 'महात्मा' ही चौदावी, परंतु त्या सर्वांहून वेगळी व वैशिष्ट्यपूर्ण ठरलेली कादंबरी आहे. ह्या कादंबरीने मराठी चरित्रात्मक कादंबरीच्या दालनात मोलाची भर घातली आहे. म.फुले ह्यांच्या जीवनचरित्राचा तपशीलवार वृत्तांत कादंबरीकार रवींद्र ठाकूर ह्यांनी आपल्यासमोर मांडला व तो कंटाळवाणा होऊ नये म्हणून त्यांनी तो कादंबरीच्या माध्यमातून मांडलेला आहे.

बालपणापासूनच प्रस्थापितत समाजाच्या विरुध्द झगडणाऱ्या बंडखोर वृत्तीच्या तात्यांच्या मनाची उलघाल, त्यांच्या मनावर झालेले संस्कार, झालेल्या अपमानातून अस्पृश्यांसाठी लढायची केलेली प्रतिज्ञा, दीन-दुबळ्या, दलित, स्त्री ह्या घटकांसाठी अहोरात्र कष्ट करणारे, सतत कार्यात मग्न असणारे, सतत कार्य चालू ठेवणारे, स्वत:च्या प्रकृतीकडेही

दुर्लक्ष करून फक्त समाजहितच पाहणारे तात्या ह्या कादंबरीतून आपल्यासमोर आलेले आहेत.

थोडक्यात, ह्या कादंबरीतील कथानक संपूर्णपणे सत्य घटनांवर आधारित असल्यामुळे कल्पनारंजकता दिसून येत नाही. वैचारिक आशयाचेच धन असलेली ही कादंबरी व तिच्यातील कथानक आहे, असे म्हणता येते.

## संदर्भ :


१. ठाकूर रवींद्र, 'महात्मा' (महात्मा जोतिराव फुले ह्यांची चरित्र कहाणी), मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे, प्रथमावृत्ती : आक्टोबर १९९९पृ. ५६

२. तत्रैव, पृ. १३

३. तत्रैव, पृ. १८

४. तत्रैव, पृ. २०

५. तत्रैव, पृ. १०६

६. तत्रैव, पृ. १११

७. तत्रैव, पृ. ११५

८. तत्रैव, पृ. ११५

९. तत्रैव, पृ. ११५

१०. तत्रैव, पृ. १३२

११. तत्रैव, पृ. १४१

१२. तत्रैव, पृ. १४१

१३. तत्रैव, पृ. १६६

१४. तत्रैव, पृ. १६७

१५. तत्रैव, पृ. १६७

१६. तत्रैव, पृ. १८९

१७. तत्रैव, पृ. १८८

१८. तत्रैव, पृ. १०४

१९. तत्रैव, पृ. २१५

२०. तत्रैव, पृ. २१५

२१. तत्रैव, पृ. २२२

२२. तत्रैव, पृ. २२२

२३. तत्रैव, पृ. २३६

२४. तत्रैव, पृ. ३१२

२५. तत्रैव, पृ. ४०१

२६. तत्रैव, पृ. ४५१